# श्री साईलीला

ऑगस्ट १९


किं. ५०-पै

## गुरुपौर्णिमा अंक



शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक

स्थापना १९१६



साईबाबांच्या
मूर्ती पूजेचीं भांडीं
व
चांदीचे
सोन्याचे
मोत्यांचे

सर्व प्रकारचें दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू सुप्रसिद्ध पेढी

# ई. आर. मालपेकर

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २ — टे. नं. ८९६३१



# श्री साई वाक्सुधा

मनुष्याच्या मागें काम, क्रोध, लोभादि जे सहा शत्रू हात धुदून लागले आहेत त्यांना आपण तत्परतेमें जिंकलें पाहिजे. त्यांचा पुरा नायनाट केल्याशिवाय आपल्या मनांत वेळोवेळीं जे नाना तरंग उमटतात त्यांचा नायनाट होणार नाहीं. त्यांना आपले गुलाम बनविलें पाहिजे. बस म्हणजे बस व ऊठ म्हणजे ऊठ! त्या सहाही गुलामांवर देखरेख ठेवण्याची कामगिरी ज्ञानरूपी जमादारावर सोंपविली पाहिजे. आणि त्याच्याहीवरचा श्रेष्ठ अधिकारी म्हणजे सद्विवेक; सद्विचार शक्ति. सुखदुःखें हीं मानण्यावर आहेत. वरीलप्रमाणें व्यवस्था अंमलांत आणिली म्हणजे तुला त्यांची बाधा होणार नाहीं. जगांत मुक्ति हेंच खरें सुख व जन्ममरण फेरा हें खरें दुःख आणि याशिवाय जीं कांहीं सुखदुःखें आहेत तीं सारीं भ्रामक स्वरूपाचीं आहेत.

— श्रीसाईसच्चरित


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४३ वें ] ऑगस्ट १९६४ [ अंक ५ वा

: संपादक :

श्री. श्रीपाद बाळकृष्ण दर्प

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. ६३३६१

: कार्यालय :

साई निकेतन,' डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कल जवळ, प्लॉट नं. ८०, बी, दादर, मुंबई १४.

# प्रिय वाचक—

श्री साई बाबा हे थोर व संतांत संत होऊन गेले. आजही त्यांच्या कृपेचें छत्र आम्हां त्यांच्या भक्तांना अविरत मिळत आहे. ज्यांना त्यांची ओळख पटली व जे त्यांच्या छायेखालीं वावरत आहेत ते खरोखर धन्य होत. बाबांनीं आम्हांला या जगांत आम्हीं कसें वागावें व सुखी कसें व्हावें हें सांगितलें.

आज ज्यांनीं जें कांहीं सांगितले ते किती व्यवहार्य आहे याचा आपण थोडासा तरी विचार करूंया. बाबांनीं नवीन कांहीं सांगितलें नाहीं. जें पूर्वकालीन ऋषीमुनी व थोर महात्मे सांगत आले तेच त्यांनीं सांगितलें, परंतु आजकाल लोकांच्या हृदयाला जाऊन भिडेल अशा भाषेंत व प्रत्यक्ष दाखले देऊन त्यांनीं तें पटवून दिले.

आपणास, आपल्यापैकीं प्रत्येकास पूर्वकर्मानुसार जन्म व स्थिति प्राप्त झालेली आहे. तेव्हां आहे त्या स्थितींत समाधान मानून रहाणें हेंच प्रत्येकाचें कर्तव्य होय. कोणावर चडफडून, नशिबाला दोष देऊन किंवा जन्मदात्याला लाखोली वाहून काय साधणार आहे ? जशी करणी तसें फळ. मागील जन्मीं ज कांहीं पाप पुण्य तुम्हीं जोडिलें तदनुरूप वाट्याला आलेली स्थिति आनंदानें पत्करणें व निदान या जन्मीं तरी सत्कृत्यांची माळ गुंफीत जीवन घालविणें हें तुमचे कर्तव्य आहे. ज्यांना या गोष्टीची जाणीव झालेली आहे तीं शहाणीं माणसें कधींहि कुरकुर किंवा दुरदूर न न करतां सत्कृत्यें करीत आनंदानें कालक्रमणा करीत असतात. तोच शहाणपणाचा मार्ग तुम्हींहि पत्करायला नको का ?

नसती भगभग; खोटी तळमळ फार वाईट. ती काय कामाची ? पूर्वकर्मानुसार एखाद्याची भरभराट: असते. घरांत संपदा असते. ददात कशाचीही नसते. म्हणून आपण चढून जायचें काय ? नाहीं बरें ! अत्यंत नम्र व्हायचें; लीनाहून लीन व्हायचें. वृक्षावर फळें ओथंबू लागतात आणि मग ते वृक्ष फळभारानें वाकतात. तसें आपण वाकायचें ! ताठरपणा बिलकूल बाळगायचा नाहीं.

होय; नम्र होणें हा एक थोर सद्गुण आहे. परंतु बाबा सांगतात कीं, 'हें नम्र होणें चांगलें ! परी न सर्वाठायीं भलें । दुष्ट दुर्जन ओळखिले । पाहिजेत पुरे या जगतीं ॥'

तुमच्या नम्रतेचा, तुमच्या भोळ्या भावाचा फायदा घेणारे, तुम्हांला लुटून फस्त करणारे लोक या जगांत वावरत आहेत. त्यांना आपण ओळखून त्यांच्याशी रास्तपणें, कठोरपणें वागलें पाहिजे. आपल्या सौजन्याचा फायदा घेण्याची संधी आपण कोणालाही देतां कामा नये. जे साधुसंत व सज्जन असतील, जे खरोखर अडचणींत व संकटांत असतील त्यांचा मान आपण राखिला पाहिजे; त्यांना जरूर

व आपल्या हातून होईल तें सत्कार्य आपण अवश्य करावें. तो तर आपला धर्म आहे असें आपण मानलें पाहिजे.

ऐन दुपारच्यावेळीं सुर्य मध्यावर येतो त्यावेळीं जी छाया पडते, त्या दुपारच्या छायेसारखी संपदेची माया आहे. ती छाया जशी हां हां म्हणतां निसटून जाते त्याचप्रमाणें संपदा कधीं बेपत्ता होईल हें आपणास समजणारही नाहीं. ती एकेजागीं टिकणारी नाहीं. आज इथें तर उद्यां तेथें! अशी तिची धांवपळ चाललेली असते. सत्कारणीं व्यय करणें, सदाचरणानें वागणें व अनाठायीं व्यय न करणें हेच तिला जवल टिकवून धरण्याचे कांहीं मार्ग आहेत. आपण नेहमीं उद्योगांत राहिलें पाहिजे. संपत्तींत इमानें-इतबारें भर टाकिली पाहिजे. आणि तिचा जपून सद्व्यय केला पाहिजे.

पैसा हातीं आला म्हणजे माणसाला मद चढतो म्हणतात! त्याला धनमद म्हणतात. त्याचा कैफ चढणार नाहीं याबद्दल आपण सावधगिरी बाळगिली पाहिजे.

अडल्या नडलेल्यास देणें, दानधर्म करणें हें या जन्मींचें आपलें पवित्र कर्तव्य आहे; परंतु तेंही आपण कर्ज काढून पार पाडतां कामा नये. अंथरूण पाहून पाय पसरावे!

हा संसार नश्वर व अशाश्वत आहे, म्हणतात. खरें आहे तें! परंतु जोंपर्यंत आपण संसारांत आहोंत तोंपर्यंत आपण संसार उत्तम प्रकारें केलाच पाहिजेत. मुलां-बाळांचें संरक्षण शिक्षंण उत्तम प्रकारें केलें पाहिजे. आणि हें सर्व करायला द्रव्य पाहिजे. शरीराला जशी पित्ताची तशीच संसाराला वित्ताची जरूरी असते हें कधींही विसरून चालणार नाहीं. तेव्हां पैसा ही आवश्यक वस्तू आहे. उठतांबसतां त्याची जरूरी लागते. तो पैसा आपण श्रम करून मिळविला पाहिजे. धनाची जरूरी आहे हें खरें असलें तरी त्यांतच आपण आपलें मन गुंतवितां कामा नये. तेंच सर्वस्व मानून रहातां कामा नये. नेहमीं उदार बुद्धि, उदार वागणूक व उदार दृष्टि ठेवावी. कृपण-पणाने वागूं नये. मात्र ती उदारता वाजवीपेक्षां फाजील असूं नये.

दान धर्म करीत असतां पात्रापात्र विचार जरूर करावा. वाटेल त्याला मदत करूं नये. सत्पात्रीं दान करावें; पंगु, अनाथ, रोगी, दीन दुबळे, पोरकीं मुलें, सार्व-जनिक व लोकोपयोगी कार्य, बाळंतपणासाठीं जाणारी अनाथ स्त्री ही सर्व मदत करण्यास पात्र आहेत. त्यांना मदत करण्याची संधी आली असतां ती सहसा दवडूं नये. आपल्या हातांत सत्ता आलेली असली तर तिचा शक्य तेवढा सदुपयोग करावा दुरुपयोग कधींही करूं नये. आपल्यावर जी जबाबदारी सोपविण्यांत आली असेल ती उत्तम प्रकारें पार पाडणें हें आपलें आद्य कर्तव्य आहे असें नेहमी मानावें व त्याप्रमाणें वागावें.

अन्नदान, वस्त्रदान योग्य जागी व योग्यता व जरूरी पाहून करावें हें सांग-ण्याची जरूरी नाहीं. आपला पोषाख अत्यंत साधा व स्वच्छ असावा. त्यांत अहंका-

राची झांक नसावी. उगाच कोणाचाही अपमान करूं नये. सर्वांशीं प्रेमानें, गोडीनें व नम्रतेनें वागावें. दुष्टांपासून नेहमीं दोन हात दूर रहावें. तुझ्या दैव योगानें तुझ्या अभौवार जीं नात्याचीं माणसें जमा झालीं असतील तें देवाचें देणें मानून त्यांच्याशीं सर्वप्रकारें प्रेमानें वागावें. हें माझें, तें माझें हा अभिमान कधींही बाळगूं नये. यापैकीं तुझ्यासंगती शेवटी कांहीं एक यायचें नाहीं. सारें येथल्या येथें रहायाचें. आपण एकटे आलों तसेंच शेवटी एकट्यानें जावयाचें ! तेव्हां कोणत्याहि खोट्या मोहांत न अडकतां नेहमीं आपल्या कर्तव्याचरणांत मग्न असावें व तोच आनंद मानावा. मी अमक्यास पोसलें, तमक्यास शिक्षण दिलें हा अभिमान बाळगूं नये. तो कांहीं कामाचा नाहीं. बाबा सांगतात कीं, "कर्तव्य आपण करावें ! कर्तृत्व ईश्वरा द्यावें ! फळही त्यासीच समर्पावें ! अलिप्त आपण रहावें "

नेहमीं सत्कार्यांत मग्न असावें. जें कार्य हातीं घेतले असेल तें उत्तम प्रकारें पार पाडावें व या जगांत कीर्तीच्या रूपाने अखंड वास करावा. शेवटीं बाबा सांगतात— " अंगीं असावें कर्तृत्व । न रहावें निर्माल्यवत । हाच पुरुषाचा पुरुषार्थ । किती सांगू तुजप्रती "


प्रिय वाचक ! असा हा बाबांचा सदुपदेश ! तो किती कल्याणकारी व जन्माचें सार्थक करणारा आहे हें वेगळे का सांगायला पाहिजे ?

गुरुपौर्णिमेनिमित्त तुम्हां आम्हांला बाबांचा हा जीवन संदेश आहे. त्यांचें आपण सतत मनन करूं या व तो संदेश झेलण्यासाठीं अहर्निश झटूं या.

—संपादक

दिव्य दृष्टीसाठीं TELIGRAM :—DIVYANETRA

शिसा ऑप्टिशिअन्स (BOM. DADAR)



[ चष्म्यांचे व्यापारी ]

यांच्या येथें तज्ज्ञ डॉक्टरांकडून डोळे मोफत तपासून
उंची व टिकाऊ चष्मे माफक दरानें मिळतात.

छबिलदास रोड, दादर (W. R.), मुंबई २८

# आत्मसंरक्षण कसें करावें ?

स्थूलदृष्ट्या आत्मसंरक्षणाविषयीं साधारण समजुतीच्या मनुष्यांस विशेष बोध करावयास पाहिजे असें नाहीं. कारण आपलें संरक्षण करण्याविषयीं मनुष्याची प्रवृत्ति स्वाभाविकच असते. कोणीं आपल्या अंगावर काठी उगारिली असतां ती आपणांस न लागण्याविषयीं पशुपक्ष्यादिक सुद्धां प्रयत्न करितात. मग सज्ञान मानवी प्राणी आपलें संरक्षण करण्याचा आपोआप यत्न करील, हें सांगावयासच नको. जसजशी ज्ञानशक्ति वाढते, व मनुष्यास दूरदृष्टि देऊन वर्तण्याची शक्ति येते, तसतसा मनुष्य केवल तात्कालिक अपायांपासून आपलें संरक्षण करून स्वस्थ बसतो असें नाहीं, तर पुढेंही आपलें संरक्षण होईल अशा तजविजीनें वागतो. आणि आरोग्यरक्षणार्थ अन्न पानादिकांच्या संबंधानें जितका सावधपणा ठेवावयास पाहिजे असतो तितका जरी मनुष्यमात्रांस ठेवितां येत नाहीं, तरी सामान्यतः मनुष्य आपल्या संरक्षणाविषयीं तत्पर असतो असें म्हटल्यास चिंता नाहीं. आतां अशा प्रकारचें आत्म-संरक्षणहि पुष्कळ अंशीं इतरांच्याही संरक्षणाविषयीं आस्था बाळगल्यानें विशेष चांगल्याप्रकारें होतें, हें ज्ञान फार थोड्या मनुष्यांस असतें; व त्यांतही तें फारच थोड्यांच्या बुद्धींत जागृत राहातें. वास्तव पुष्कळांची प्रवृत्ती इतकी दूरवर दृष्टि देऊन आत्मसंरक्षण करण्याविषयीं होत नाहीं, म्हणून प्रायः—

> " आत्मानं सततं रक्षेद्दारैरपि धनैरपि;
> पुनर्दारा पुनर्वित्तं न शरीरं पुनः पुनः। "

" आपलें सतत संरक्षण करावें, त्यासाठीं सर्व धन खर्चावें लागलें किंवा प्रत्यक्ष आपल्या स्त्रीचाही त्याग किंवा नाश करावा लागला तरी करावा. स्त्री व धन हीं पुन्हां मिळतील. परंतु शरीर पुनः पुन्हा मिळणार नाहीं. या वचनास अनुसरून केवळ स्वशरीरसंरक्षणाकडेच मनुष्यांची प्रवृत्ति असते. असो; ही आत्मसंरक्षणाची प्रवृत्ति आपण म्हणजे आपले शरीर, या देहात्म्यभावास अनुसरून असते. परंतु आपण म्हणजे केवळ आपला देह नव्हे; आपल्यामध्यें देहाहून भिन्न असून देहास वागविणारें असें चिन्मय आत्मतत्व आहे; शरीर हें केवळ त्याचें राहण्याचें स्थान असून ज्ञानप्राप्तीचें व सुखोपभोगाचें साधन होय; तें आत्मतत्त्व अथवा आत्मा शरीराबरोबर नाश पावणारा नव्हे; तो शरीराहून भिन्न असून चिरस्थाई आहे; शरीराच्या सुखदुःखानें व स्वस्थाऽस्वस्थतेनें जरी त्यास तात्कालिक सुखदुःखाचा अनुभव येतो, तरी त्याचें विशेष सुखदुःख, त्याच्या विशेष स्वास्थ्याविषयीं उपाय, व त्याच्या अस्वास्थ्यास कारण होणारे अपाय ह्या गोष्टी देहाच्या स्थितीवर अवलंबून नाहींत; अतएव केवळ देहसंरक्षणानें आत्मसंरक्षण होत नाहीं; किंबहुना देहसंरक्षणांतच जर आपलें मन

अगदीं व्यग्र होऊन गेलें, तर देहसंरक्षण होत असूनही आत्मनाश होण्याचा संभव आहे, व देहसंरक्षणाविषयीं जितक्यास तितकें लक्ष्य असलें तरी योग्य उपायांनीं आत्मसंरक्षण चांगल्या प्रकारांनीं होऊं शकतें; इत्यादि आत्मतत्त्वाच्या गोष्टींकडे लक्ष ठेवून आत्मसंरक्षणाचा विचार केला पाहिजे;

आत्मसंरक्षण म्हणजे आत्मा सुदृढ, बलिष्ठ व तेजस्वी करून त्यास शिथिलता, दुर्बलता, मलिनता व ग्लानी आणणारे अपाय टाळणें हें होय. आतां आत्मा सुदृढ करणें म्हटलें म्हणजे आत्म्याचे ठावीं ज्या शक्ति बीजरूपानें आहेत त्या व्यायामानें व अभ्यासानें वाढवून दृढ करणें. आत्म्याचे ठायीं विचार, विवेक, स्मृति, भाव, भक्ति, दया, क्षमा, शांति, धैर्य, परोपकारपरता, इत्यादि गुण व शक्ति सहज बीजरूपानें आहेत. त्या आध्यात्मिक व्यायामानें व वारंवार अभ्यासानें वाढतात व दृढ होतात; तशाच आळसानें व दुर्लक्ष्यानें आधीं उद्भूतच होत नाहींत, आणि त्यांपैकीं कांहीं सहज रीत्या थोड्याबहुत उद्भूत झाल्याच तर वाढून सुदृढ होत नाहींत. म्हणून आळस व दुर्लक्ष्य यांच्या योगानें जसें शरीरास शैथिल्य येतें, तसेंच आध्यात्मिक स्थितीच्या संबंधानें आळस व दुर्लक्ष्य यांचे योगानें पूर्वोक्त आत्मिक शक्तींसही शैथिल्य येतें.

दुसरें असें आहे कीं, या आध्यात्मिक शक्तींचा उपयोग केवळ शारीरिक गोष्टींच्या संबंधानेंच केला तर त्यांच्या ठायीं क्षुद्रता येते, व आत्मभाव दृढ करण्यास त्या उपयोगीं पडत नाहींत. यामुळें आत्मा सुदृढ होत नाहीं. शरीर कदाचित् बलिष्ठ व तेजस्वी झालें तरी आत्मा बलिष्ठ व तेजस्वी होत नाहीं. शारीरिक आरोग्यरक्षण झालें तरी आत्मिक आरोग्य होत नाहीं. शरीराचे अपाय टळले तरी आत्म्यास होणारे अपाय टळूं शकत नाहींत. शरीरास अपघातानें किंवा अनास्थेनें येणारें अकालिक मरण जरी टळलें तरी आत्मा मरणधर्महीन असूनही त्यास मरण येतें. सारांश शरीरस्वास्थ्य जरी इष्ट आहे, तरी आत्मिक स्वास्थ्यावांचून तें सुखकारक किंवा कल्याणकारक होत नाहीं. कारण कीं, शारीरिक व आत्मिक जीवन हीं अगदीं भिन्न आहेत. शारीरिक जीवन म्हणजे काय हें सांगावयास पाहिजे आहे असें नाहीं. तें सामान्यतः मनुष्यमात्रास किंबहुना प्राणिमात्रास कळतें, व तें बाह्य व स्थूल असल्यामुळें त्याजकडे लक्ष्यही सहज असतें; आणि कदाचित् दुर्लक्ष्य झालेंच तर त्याचा परिणाम प्रायः तत्कालींच अनुभवास आल्यामुळें पुनः लागलेंच तिकडे लक्ष्य वळतें. परंतु आत्मिक जीवनाची गोष्ट तशी नाहीं. तें आधीं स्थूल दृष्टीनें दिसत नाहीं; आणि कदाचित् अंशतः दिसलें, तथापि त्याचें महत्त्व ध्यानांत न आल्यामुळें त्याजकडे प्रायः सर्वदां सर्वांचें दुर्लक्ष्यच असतें. अतएव आत्मिक जीवनाचें स्वरूप काय हें सारासारविवेकानें जाणलें पाहिजे.

आतां आत्मिक जीवनाच्या संबंधानें पहिली गोष्ट ध्यानांत धरिली पाहिजे ती ही कीं, आत्मा शाश्वतजीवी आहे. तो पंचभौतिक देहरूप संघातावरोबर

विलयास जाणारा नव्हे. यास्तव त्याच्यावर होणाऱ्या संस्काराचा परिणाम बरा वाईट होणार तो चिरकालीन होतो. आत्मिक जीवनाचा मुख्य आधार श्रद्धा होय. कारण आध्यात्मिक विषय ज्ञानगम्य असल्यामुळें इंद्रियगोचर विषयांप्रमाणें त्यांच्या अस्तित्वाविषयीं प्रतीति सतत राहात नाहीं. ती प्रतीति श्रद्धा ज्या मानानें जागृत व दृढ असते, त्या मानानें उद्भूत होते, आणि ही प्रतीति वारंवार उद्भूत होऊन स्थिरावल्यावांचून अध्यात्मिक जीवनाची स्मृति व तद्विषयक जागृति पाहिजे तशी होत नाहीं. सर्वांतर्यामीं परमात्मा परमेश्वर अत्यंत वात्सल्ययुक्त पितृरूपानें, अत्यंत प्रेमयुक्त जननीरूपानें, अत्यंत स्नेहयुक्त मित्ररूपानें अत्यंत सामर्थ्ययुक्त शास्तृरूपानें किंवा अत्यंत प्रसादयुक्त स्वामिरूपानें, व अतिप्रेमळ व हितार्थी सद्गुरुरूपानें विशुद्ध आत्म्यास अतिसन्निध आहे. ही गोष्ट ज्ञानानें निर्विवाद व निश्चित ठरून सत्य आहे अशी बुद्धि झाली, तरी त्या ज्ञानाचें वारंवार मनन, निदिध्यासन, यांचे योगानें ती बुद्धि स्थिरावून तिला जर श्रद्धेचें म्हणजे अचलप्रतीतीचें रूप आलें नाहीं, तर ती बुद्धि आध्यात्मिक जीवनास उपयोगी नाहीं. ज्याप्रमाणें क्षणैक उत्पन्न होणारें विद्युत्तेज सतत प्रकाश देण्याच्या उपयोगाचें नाहीं, त्याप्रमाणें ती बुद्धि आपल्या चित्तास आध्यात्मिक जीवन विचाराच्या वेळीं मात्र दाखविण्यास उपयोगी पडली तरी तिजकडून आध्यात्मिक जीवन सतत प्रकाशित होऊं शकणार नाहीं; आणि तसें होईपर्यंत त्या जीवनासंबंधीं जी स्फूर्ति व आस्था उत्पन्न झाली पाहिजे. व तदनुरूप जी आपल्या सर्व आत्म्याची प्रवृत्ति झाली पाहिजे, जिच्यायोगें आत्मिक जीवन सफल होणार, ती होऊं शकत नाहीं. ज्याप्रमाणें पुरुषास पत्नीवांचून संसार नाहीं, त्याप्रमाणें आत्म्यास श्रद्धेवांचून आत्मिक जीवनच नाहीं.

ज्याप्रमाणें यज्ञकर्ता यजमान पत्नीवांचून यज्ञ करण्यास योग्य होत नाहीं, त्याप्रमाणें हा आध्यात्मिक जीवनरूपी यज्ञ करण्यास आत्म्यास श्रद्धारूप पत्नी असल्यावांचून योग्यताच येत नाहीं. अतएव—

"तस्यैवं विदुषो यज्ञस्यात्मा यजमानः श्रद्धा पत्नी" असें म्हटलें आहे तें अगदीं यथार्थ आहे. तसेंच धर्मास श्रद्धा हें आयतन म्हणजे राहाण्याचें स्थान असें अन्यत्र म्हटलें आहे, तेंहि अगदीं यथार्थ आहे. कारण ज्ञानानें जो धर्म म्हणून वाटला, तो श्रद्धेनें प्रत्यक्षता पावल्यावांचून तद्विषयक प्रवृत्ति होत नाहीं. म्हणून पारमार्थिक जीवनाचा सर्व आधार श्रद्धा होय. वर श्रद्धेविषयीं जो प्रसंगोपात्त उद्गार आला आहे, त्यावरून हें ध्यानांत आलेंच असेल कीं श्रद्धेविषयीं सामान्य जी समजूत आहे त्याहून कांहीं अंशीं निराळी येथें गृहीत केली आहे. श्रद्धेविषयी सामान्य समजूत आहे ती ही कीं, दुसऱ्यानें सांगितलेल्या गोष्टीवर विश्वास ठेवणें, माझ्या समजुतीनें हा श्रद्धेचा केवळ एकदेश किंवा तिचें हें अपूर्ण स्वरूप होय. श्रद्धेचें वास्तविक स्वरूप म्हटलें म्हणजे आपल्यास ज्या विषयांच्या अस्तित्वाविषयी निर्बाध ज्ञान झालें,

ते विषय तसेच खरोखर आहेत असा विश्वास दृढ होणें, असें श्रद्धेचें स्वरुप मानिलें म्हणजे स्वतः आपल्यास विचारांतीं झालेल्या ज्ञानावर श्रद्धा म्हणजे पूर्वोक्त प्रकारचा विश्वास उत्पन्न झाला पाहिजे. तात्पर्य अतींद्रिय विषयांचें ज्ञान आप्तवाक्यानें होवो, एकंदर बाह्य सृष्टीच्या अवलोकनानें होवो, किंवा आपल्या आध्यात्मिक स्थितीच्या चिंतनानें होवो, कोणत्याहि द्वारानें होवो, त्याचे यथार्थत्व बुद्धीनें निश्चित केलें म्हणजे वारंवार मनन व निदिध्यासन करुन ते श्रद्धेनें मनास प्रत्यक्षवत् झालें पाहिजे. म्हणजे बाह्य जीवनविषयक प्रवृत्तीप्रमाणें आध्यात्मिक जीवनाविषयीं आपली सहज प्रवृत्ती होईल. धर्मपरायण मनुष्यें आणि इतर मनुष्यें यांमध्यें पहिला भेद हा असतो कीं, पहिल्यांच्या ठिकाणीं अशी श्रद्धा असतें कीं, जिच्या योगानें त्यांच्या ज्ञान-दृष्टीपुढें आध्यात्मिक विषय बाह्यविषयाप्रमाणें प्रत्यक्षवत उभे असतात. तसे इतरांच्या ठिकाणीं ती श्रद्धा नसल्यामुळे त्यांच्या ज्ञानदृष्टीपुढें असत नाहींत. म्हणून पहिल्यांचे ठायीं परमार्थिक विषयांविषयीं सम्यक स्मृति किंवा वास्तविक जागृति असते. परंतु इतरांस त्या विषयांचे विस्मरण होऊन त्यांचा पुष्कळ काळ भान असल्यावांचून जातो.

"या निशा सर्वभूतांना तस्यां जागर्ति संयमी"—तसेंच परमार्थिक विषयांकडे ज्यांची दृष्टि विशेष लागली आहे त्यांची बाह्यदृष्टि अशा मनुष्याप्रमाणें चित्तवृत्ति बाह्यविषयांत निमग्न नसल्यामुळें त्यांचा पुष्कळ काळ बाह्यसृष्टीविषयक अभानांतच जातो. "यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुने; ॥" पारमार्थिक ज्ञान जसजसें यथार्थ व निर्दोष होईल, तसतसें श्रद्धेसही विशुद्ध रूप येईल; परंतु पारमार्थिक विषयांस प्रत्यक्षता येण्यास श्रद्धारूप चक्षू अवश्य प्राप्त झाले पाहिजेत.

परमार्थिक विषयांमध्यें परमात्मदर्शन हा मुख्य विषय होय. ज्याप्रमाणें या देह-रूपी पिंडाचा प्रवर्तक आपला जीवात्मा नियतशक्ति आहे, त्याप्रमाणें या सर्व स्थिर-चरात्मक विश्वाचा प्रवर्तक अनंतशक्ति असा आत्मा अवश्य आहे; आणि तो सर्वप्रकारें जीवात्म्याहून परमश्रेष्ठ असल्यामुळें त्यास परमात्मा हें नाम आहे. तो सर्व ब्रह्माण्डाचा व आपल्याही आत्म्यांचा आत्मा व नियंता आहे, म्हणून त्यास अंतरात्मा व अंतर्यामी अशींहीं नामें आहेत. त्याची सर्व विश्वावर सत्ता असून त्यांतील सर्व राज्यसूत्रें तो आपल्या हातीं ठेवितो, म्हणून त्यास ईश्वर किंवा परमेश्वर असेंही म्हणातात.

रूप हें चक्षुरविषयीं आहे. तें श्रवणविषय होऊन ऐकावयास आलें पाहिजे, तरच आम्ही तें आहे म्हणून मानूं, असें जर कोणी म्हटलें तर तें म्हणणें अगदीं असंबद्ध होईल, तसेंच रूपादिबाह्यगुणरहित केवळ मनोगम्य व अंतःप्रत्यक्ष असे जे दया, क्षमा, शांति, वात्सल्य इत्यादि भाव, ते जर इंद्रियगोचर झाले तरच आम्हीं खरें मानूं असें कोणी म्हणेल तर तेंहि म्हणणें केवळ प्रलापरुप होईल. तद्वत् आपल्या ठायीं अहंभावनेनें प्रतीत, केवळ विज्ञानैकगम्य, रूपादिगुणरहित, जो आपला शरीर-

धारी जीवरूपी आत्मा, जो इच्छा, ज्ञान, इत्यादी वृत्तींचें अधिष्ठान, तो ब्रम्हेंद्रियगोचर नसल्यामुळें आहे असें आम्हीं मानूं शकत नाहीं. असें जर कोणी म्हटलें तर तेंहि त्याचें म्हणणें अविचाराचेंच समजलें जाईल. कारण आपणामध्यें एकमेकांविषयींचें प्रेम किंवा द्वेष, पूज्यभाव किंवा तिरस्कार सदयता किंवा निर्दयता, इत्यादि ज्या भावना उद्भवत होतात त्या आपल्या या बाह्यशरीराविषयीं नसून तदंतर्वर्ती जें आत्मरूपी भिन्न चालक तत्व त्याविषयीं होत असा सर्वांचा अनुभव आहे. देह फार सुंदर असून त्याचें चालक तत्व कधीं कधीं आपल्यास अत्यंत अप्रिय होतें; देह अत्यंत कुरूप असूनही सद्गुणमंडित आंतरतत्व आपल्या अत्यंत प्रेमास पात्र होतें. आतां हाच जीवात्मविषयक विचार व्यापक दृष्टीनें मनांत आणिला, म्हणजे जीवांतर्यामी व जडान्तर्यामी असा जो परमात्मा, त्याच्या परिपूर्ण मंगलगुणमय स्वरूपाविषयीं आपल्यास भावना होऊन तद्विषयक प्रेम, आदर इत्यादि सद्भाव आपल्या अंतःकरणांत उत्पन्न होऊं शकत नाहींत, असें म्हणणे अत्यंत असंगत होय. वास्तव परमेश्वराचें स्वरूप ज्ञानलक्ष्य असून, त्या ज्ञानास ध्यान, मनन, निदिध्यासन, यांच्या योगानें दृढता येऊन, विमलश्रद्धारूपी दृष्टीस त्याचें अत्यंत साक्षात् व समीप दर्शन होणें अशक्य नाहीं; य या प्रकारें त्यास जे पाहूं इच्छितात त्याच्या अंतर्दृष्टीस त्याचे साक्षात् दर्शन होतें, असा अनुभवही आहे. इतकें मात्र ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, प्रत्यक्षाचे मुख्य दोन भेद आहेत; बाह्यप्रत्यक्ष व आंतरप्रत्यक्ष,–इंद्रियप्रत्यक्ष व ज्ञानप्रत्यक्ष, त्यांत बाह्यप्रत्यक्षामध्यें जसें चाक्षुषप्रत्यक्ष श्रवणप्रत्यक्ष होऊं शकत नाहीं; जसें मानसप्रत्यक्ष इंद्रियप्रत्यक्ष होऊं शकत नाहीं; तद्वत् विज्ञानप्रत्यक्ष व विमलभावप्रत्यक्ष, अतीन्द्रिय, मंगलगुणविशिष्ट, जें ईश्वरस्वरूप, तें सर्वथा बाह्येन्द्रियप्रत्यक्ष होऊं शकत नाहीं; आणि जसें बधिरास शब्दविषयक ज्ञान


## लहान मुलांच्या आंकडीवर

**जुनें आणि प्रसिद्ध औषध**

**जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी**

सोल प्रो. **जयकर ब्रदर्स**, ६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १.

: स्टॉकिस्ट :

**कांचनलाल वाडीलाल कं.** — दवाबझार, मुंबई २.

होत नाहीं. किंवा अंधास रूपविषयक ज्ञान होत नाहीं. तसेंच तत्त्वज्ञानदृष्टिविहीनास व भावविहीनास परमेश्वरदर्शन होऊं शकत नाहीं. अतएव ज्यांच्या ठायीं परमार्थदृष्टि नेहमी जागृत असते, त्यांनीं ज्ञान-ध्यान मननादि ईश्वरदर्शनाचीं व ईश्वरसान्निध्याचीं आपल्या अनुभवानें जीं साधनें सांगितलीं आहेत. त्या साधनांनीच ती अमोलिक गोष्ट साध्य केली पाहिजे.

परमात्मस्वरूपाचें दर्शन झालें म्हणजे मनन निदिध्यासनाच्या योगानें तें अंतःकरणांत ठसून उज्वलभाव दृष्टीस साक्षात् लभ्य होतें. तसें झालें असतां त्या आनंदमय, शांतिनिकेतन, मंगलधामाच्या ठायीं आपल्या आत्म्यास अभ्यासानें अचल निष्ठा प्राप्त होते. व निरंतर अधिकाधिक प्रेमानें आत्मा परमात्म्याचें ठायी जडला म्हणजे भक्तियोगानें तो त्यांचें नित्यसान्निध्य अनुभवितो. हा जो त्याच्या नित्यसान्निध्याचा व समागमाचा अनुभव, त्याच्या योगानें आत्म्यास शांति, शुद्धि, व आनंद यांचा सदा लाभ होतो. हेंच आत्म्याचें खरें जीवन, हेंच आत्म्याचें मोक्षसाधन, याच्याच योगानें आत्मा उन्नत व तेजस्वी होतो. याचे योगानेंच पापाविषयीं तिरस्कार, सत्कर्माविषयीं आदर, सर्व भूतांचे ठायीं दयादृष्टि, शमदमादि आध्यात्मिक संपत्ति इत्यादि सर्व प्राप्त होतें. आत्मा परमात्म्यावर सर्व प्रकारें निर्भर होतो. व परमात्म्याच्या इच्छेस अनुकूल अशीच आपली इच्छा ठेवितो. कामक्रोधादि आध्यात्मिक रोग त्यास बाधा करूं शकत नाहींत. तो गेल्याचा, शोक करीत नाहीं, संकटाची चिंता करीत नाही, व जरामरणाचें भय बाळगीत नाहीं, तो देहसंस्था चालवितो, देहसंबंधीं सर्व कर्तव्यकर्में विवेकपूर्वक करितो, व प्राणीमात्राविषयीं सदयबुद्धी ठेवून आपली सर्व ऐहिक कर्तव्यकर्में विवेकपूर्वक करितो. तद्विषयक श्रम किंवा क्लेष झाले तरी त्यांची क्षति न करितां आपले सर्व ऐहिक संबंध योग्यप्रकारें रक्षितो. परंतु त्यांत आसक्त न होतां देहवियोगास पाहिजे तेव्हां सिद्ध असतो.

ईश्वरदर्शन व त्याच्या नित्य अनुभवानें प्राप्त होणारी ईश्वरनिष्ठा, ही दोन आत्मजीवनरक्षणाचीं व आत्मपोषणाचीं, म्हणजे आत्मा पारमार्थिक बलानें अधिकाधिक बलिष्ठ व तेजस्वी करण्याचीं मुख्य साधनें होत. शरीररक्षणास व पोषणास जसें अन्नोदक, तसेंच आत्मजीवनास व आत्मरक्षणास ईश्वरसमागमजन्य प्रेम, चित्तशुद्धि व शांति ही होत. परंतु क्षुधातृषा प्रदीत राहिल्यावांचून अन्नोदकाचें सेवन होत नाहीं. आणि व्यायामावांचून क्षुधा तृषा लागत नाहीं, तद्वत् आत्म्यानें निरालस्यानें व सायधपणानें आपली सर्व कर्तव्यकर्में करीत असणें, हा जो आत्म्याचा व्यायाम, तो यथास्थित होत असला म्हणजे त्यास पुनः पुन्हा ईश्वरसमागमरूप अन्नोदकाचें व ईश्वरनिष्ठारूप विश्रांति, यांचें ग्रहण अवश्य वाटतें. त्याचे योगानें कर्तव्याचरणानें होणारा आध्यत्मिक श्रम दूर होतो, व आत्मा फिरून कर्तव्याचरणास समर्थ होतो.

परंतु शारीरव्यापार यथास्थित चालण्यास ज्याप्रमाणें शरीराची अंतर्बाह्य सर्व

प्रकारची मलिनता लक्षपूर्वक व यत्नपूर्वक नित्य दूर केली पाहिजे, त्याप्रमाणें आत्म्याचें सर्व व्यापार यथास्थित होण्यास त्याच्या ठिकाणी हीं गैरसावधपणानें होणारी असद्वासनारूप, व असद्विचाररूप, अभ्यन्तर मलिनता,व असत्प्रवृत्तिरूप बाह्य मलिनता यांचेंही लक्ष्यपूर्वक व प्रयत्नपूर्वक वारंवार परिशोधन करीत असलें पाहिजे. तरच ज्ञान, ध्यान, मनन, निदिध्यासन, उपासना इत्यादि आत्मिक व्यवसाय यथास्थित होतील. ही आत्मिक मलिनता दूर करण्यास शुद्धिसाधनें आत्मपरीक्षण व अनुताप हीं होत.

पूर्वी जें आध्यात्मिक जीवन म्हणून शारीरिक जीवनाहून निराळें सांगितलें, तें यथार्थज्ञानानें चांगलें समजलें, निर्मळ श्रद्धेनें सत्यता पावलें, आणि अचल श्रद्धेनें पाहिजे तेव्हां बाह्य जीवनाप्रमाणें ज्ञानदृष्टीस प्रत्यक्ष होऊं लागलें, तरी स्वभावतः आपलें मन प्रायः शारीरिक जीवनांत निमग्न होत असल्यामुळें आपण बुद्धिपुरःसर त्यांतून त्यास काढून आत्मिक जीवनाकडे वळविलें पाहिजे. हें जितकें वारंवार घडेल तितकें चांगलें. परंतु दिवसांतून निदान एक दोन वेळ तरी एकांती अव्यग्रमनानें या आत्मिक जीवनाचा अनुभव घेतला पाहिजेः—

"एकाकी चिंतयेन्नित्यं विविक्ते हितमात्मनः ;
एकाकी चिंतयानेंहि परं श्रेयोऽधिगच्छति, "

**अर्थ**—नित्य एकांतीं एकटें बसून आत्मकल्याणाविषयीं चिन्तन करावें. याप्रमाणें एकांतचिंतन केलें असतां आत्म्याचें परम कल्याण होतें.


या एकांत चिंतनामध्यें हळू हळू मन बाह्य विषयांतून काढून आत्मस्वरूपाकडे लावावें. आत्मस्वरूप प्रतीत झालें म्हणजे आदरपूर्वक स्मरणानें परमात्मदर्शन करून, त्याच्या अत्यंत पवित्र व आनंदकारक गुणांचें ध्यान करून, आपला आत्मा तद्विषयक लीनता, पूज्यबुद्धि. दृढानुराग, इहीकरून युक्त झाला; म्हणजे परमेश्वरचरणीं शरणापन्न होऊन सर्व आत्मस्थिति त्यास निवेदन करावी. आत्मगत दोष प्रांजळ बुद्धीनें व शुद्ध पश्चात्तापयुक्त अंतःकरणानें त्यापुढें ठेवून, अत्यंत बिनम्रपणें व अनन्यगतिकत्वानें त्यापाशी आपली दुर्बलता कबूल करून, घडलेल्या दोषांविषयीं क्षमा मागावी. पुढें ते दोष टाळण्याविषयीं अंतःकरणपूर्वक केलेला निश्चय त्यास अतिविनयानें सांगून, दीनपणें तो सिद्धीस नेण्याविषयीं त्याच्या कृपेचें साह्य मागावें. याप्रमाणें ईश्वरसमागम करून, त्यापासून आत्म्यावर झालेले शुद्धि, आनंद, समाधान. लीनता इत्यादि संस्कार कांहीं वेळपर्यंत तसेंच आत्म्याचे ठायीं आत्मगत होऊं द्यावे. अनिर्वाहपक्षांस्तव पुनः शारीरिक प्रवृत्तींचा स्वीकार लौकरच केला पाहिजे. हें खरें परंतु तो पूर्वोक्त संस्कारांचा अनुभव घेत हळू हळू करावा. असें नियमानें करीत असलें म्हणजे आपली बाह्यप्रवृत्तिसुद्धां निर्मल व विवेकयुक्त होते, आणि शरीरक्षण, स्त्रीपुत्रादिक आप्तांशी सहवास, त्यांचें सर्व प्रकारें संगोपन, इतरांशीं सहवास, त्यांविषयीं आपलें अवश्य कर्तव्य, इत्यादि सर्व बाह्य प्रपंच आपण ईश्वराज्ञेनेंच करीत आहों. अतएव तो आस्थापूर्वक निःस्वार्थ

बुद्धीनें अवश्य कर्तव्य म्हणूनच करावा असें आपल्यास वाटतें. त्यांत आपणाकडून आळस किंवा अनास्था होत नाहीं. परमार्थिक बुद्धि नित्य एकांतीं आत्मिक जीवनाचा अनुभव घेऊन जागृत ठेविली, म्हणजे प्रपंचांत आपलें मन कधींही अमर्याद आसक्त होत नाहीं.

शेवटीं प्रपंचकृत्यें आटपल्यावर प्रत्यहीं पुनः एकान्ती आत्मकल्याणचिन्तन करावें. तें विशेषेंकरून आत्मपरीक्षणरूपानें करावें. आपली पारमार्थिक बुद्धि कितपत जागृत राहिली. आपला विवेक कितपत विजयी झाला, आपले सुनिश्चय कितपत सिद्धीस गेले, आपल्यांतील लीनता इत्यादि सद्‌वृत्ति कितपत स्थिर राहिल्या आपल्या ठिकाणीं कांहीं अहंतेचा अंश उत्पन्न झाला कीं काय, झाला असेल तर तो कशानें झाला, व त्याचें निरसन कोणत्या विचारानें होईल, आपली सदाचरणाची इच्छा व पापाचरणाचा तिरस्कार हीं कितपत जागृत राहिलीं, आपणाकडून आत्मविषयक परनिरयक व ईश्वरविषयक कर्तव्यांत काय अंतर पडलें, सारांश, ईश्वरास आपण विशेष प्रिय, किंवा विशेष अप्रिय झालों, कल्याणाचे मार्गांत आहों. किंवा अकल्याणाचे मार्गाकडे वळलों, आपला आत्मा उन्नतभाव धारण करीत आहे, किंवा अधोमुख होत आहे, या सर्व आत्मिक जीवनसंबंधी गोष्टींचा संबंधानें आपल्या आत्म्याचें कसोशीनें परीक्षण करून जें योग्य घडलें असेल त्याविषयीं कृतज्ञतापूर्वक समाधान मानून, जें अयोग्य घडलें असेल त्याविषयीं अंतकरणपूर्वक व अत्यंत खेदपूर्वक अनुताप करून चित्त निर्मळ झालें म्हणजे तें ईश्वराकडे योजून, त्यापाशीं आपल्या सर्व अपराधांची अत्यंत दीनवृत्तीनें क्षमा मागावी, आणि पुढें विशेष आस्थेनें व जागृतीनें आपले शुभ संकल्प सिद्धीस नेण्याचा निश्चय करून, तदर्थ सविनय आपला वत्सल पिता व गुरु जो परमेश्वर त्याचें साह्य मागावें. आणि पुनः अनन्यग तिकत्वानें बालक मातेवर निर्भर होऊन राहाते, त्याप्रमाणें आपला आत्मा परमप्रेमास्पद ईश्वररूपी निर्भर करून निश्चित व्हावें.

येथवर जें सांगितलें आहे तें आत्मिक जीवनाच्या दिनचर्येविषयीं प्रायः सांगितलें आहे. याप्रमाणें दिनचर्या प्रत्यहीं ठेविली तर आत्मिक जीवन यथास्थित होऊन आत्मसंरक्षण सुखकर होईल. परंतु आत्मिक जीवनावर आपल्या दुर्बलतेमुळें अकस्मात् येणारे आघात चुकविण्यासाठीं, व आत्मिक बळ सर्वप्रसंगीं अपराजित रहण्यासाठीं व पूर्वोक्त दिनचर्या ही आस्थापूर्वक घडून येण्यासाठीं, वेळोवेळीं, संधि सांपडेल तेव्हां, जेथें सृष्टिस्वरूप अत्यंत रमणीय व ईश्वरी गुण मनांत ठसण्यास अत्यंत उपकारक आहे, अशा एकांत स्थळी कांहीं काळपर्यंत घालवून एकाग्र चित्तानें आत्मिक जीवनाविषयीं विचार केला पाहिजे. तेणेंकरून आत्मिक शक्ती विशेष सुदृढ होऊन आत्म्याचें औदासिन्य जाऊन निश्चयाचें बळ वाढतें, आणि उत्साहही वाढतो. तसेंच परमार्थिक प्रवृत्तीस अत्यंत उपयोगी अशा ग्रंथांचे वाचन. परमार्थपरायण मनुष्यांच्या चरित्रांचे परिशीलन, आणि साधेल तितका ज्या ज्या मनुष्याचा जो जो आत्मिक

गुण विशेष आढळेल त्या त्या गुणांच्या प्राप्तीसाठीं त्या त्या मनुष्याचा समागन, याही गोष्टी आत्मिक जीवनाच्या सिद्धयर्थ व आत्मसंरक्षणार्थ करीत असले पाहिजे. येथें जें कांहीं सांगतलें आहे त्याचा आशय शारीरिक जीवना विषयीं दुर्लक्ष्य करावें असा मुळींच नाहीं, व तसेंच दुर्लक्ष्य होण्याचाही प्रायः संभव नाहीं, परंतु आत्मिक जीवनाविषयीं प्रायः जें भान देखील नाहीसें होते, व ज्याच्या योगानें शारीरिक जीवनही यथायोग्य होऊं शकत नाहीं, तें न व्हावें आणि आत्मिक जीवनाचें महत्व व त्याचा आणि शारीरिक जीवनाचा खरा संबंध ध्यानांत येऊन प्रवृत्तिपूर्वक निवृत्तिमार्ग, व निवृत्तिपूर्वक प्रवृत्तिमार्ग असे दोन्ही मार्ग सिद्ध होऊन मानवी जीवनाचे सार्थक व्हावें, हाच या विवरणाचा आशय आहे. मनुष्यास आपल्या ऐहिक कुटुंबाचें रक्षण करणें जसें अवश्य आहे, तसेंच पारमार्थिक कुटुंबाचेंही रक्षण करणें अत्यंत आवश्यक आहे. आत्म्याचा सात्त्विक श्रद्धारूप पत्नीशीं योग असला म्हणजे तिजपासून बोध, विवेक, उपशम, विनय, उत्साह इत्यादि भाव उत्पन्न होतात, तशाच जागृति, विरक्ति भक्ति, शुचिता, निष्ठा इत्यादि सद्वृत्ति उत्पन्न होतात. या सर्व पारमार्थिक कुटुंबाचें संगोपन केल्यावांचून ऐहिक कुटुंबाचें पालन यथास्थित होत नाहीं. व या दोहींचें संगोपन योग्य प्रकारें झाल्यावांचून मानवी जीवन कृतार्थ होत नाहीं. सारांश, आत्मसंरक्षणार्थ या दोहोंचेंही परिपालन आवश्यक आहे.



॥ श्रीसाईनाथ प्रसन्न ॥

# महिला वस्तु भांडार

भरतकाम, विणकाम, शिवणकाम
यांस लागणारें सर्व साहित्य व भरतकामाचीं पुस्तकें
लोंकर, गंगावनें आणि सौंदर्यप्रसाधनांचे व्यापारी.
छबीलदास रोड, दादर, मुंबई २८. (वेस्टर्न रेल्वे)
※ आमची कोठेंही शाखा नाहीं. ※

# मौनम् सर्वत्र साधनम्

**********************

—रमण महर्षि

एकदां आंध्र प्रांतांतील कोणी एक तरुण रमण महर्षीची कीर्ति ऐकून त्यांच्या भेटीसाठीं त्यांच्या निवासस्थानीं आला. त्यांना नमस्कार करून तो म्हणाला, "भगवान्! मी मोक्षासाठीं अत्यंत आतूर झालेला आहे. तो कशारीतीनें मिळवावा याची मला चिंता लागून राहिली आहे, वेदान्तासंबंधीं जितकें कांहीं वाङ्मय मिळवितां आलें तेवढें मिळवून मी तें वाचून काढलें. त्यावरून मोक्षाप्रत जाण्याचे मार्ग वेग-वेगळे आहेत असें मला आढळून आलें. विद्वान लोकांच्याही मी भेटी गांठी घेतल्या. त्यांच्या सांगण्यांतही मला एकवाक्यता आढळून आली नाहीं. त्यामुळें मी घोटाळ्यांत पडलों आहे. तुम्ही तरी मला मार्ग दाखवाल या आशेनें येथें आलों आहे.

रमण महर्षींच्या चेहऱ्यावर एकदम हास्य चमकलें. ते म्हणाले, "मग ठीक आहे; ज्या मार्गानें आलास त्या मार्गानें परत जा."

हें उत्तर ऐकतांच तेथें बसलेले सारे भक्त विस्मयचकित झाले. तो बिचारा तरुण मोठ्या आशेनें आलेला! त्याला काय बोलावें हेंच समजेना. बिचारा तेथेंच बसून राहिला महर्षि रमण तेथून निघून जाईपर्यंत. नंतर केविलवाण्या चेहऱ्यानें तो सभोंवार पाहूं लागला आणि म्हणाला. "सभ्य गृहस्थ हो, काय सांगूं माझी कथा तुम्हांला. आत्यंतिक त्रास सोसून व गांठीला चार पैसे होते ते खर्च करून मी येथवर आलों. मोक्षाचा मार्ग समजावा याची माझ्या मनाला उत्कंठा लागून राहिली होती. मोठ्या आशेनें मी येथें आलों आणि अशा मला आलांत त्या मार्गानें जा म्हणून सांगणें रास्त वाटतें का तुम्हांला? हा का चेष्टेचा विषय आहे!"

त्याचा सवाल ऐकून त्या मंडळींपैकीं एकजण म्हणाला, "होय, हा चेष्टेचा विषय नाहीं हें अगदीं खरें आहे. महाराजांनीं तुम्हांला योग्य तें व अगदीं बरोबर उत्तर दिलें. तें तुम्हीं समजून मात्र घेतलें पाहिजे.

मी कोण आहे? हें समजून घेणें हाच मोक्षप्राप्तीचा मार्ग, 'मी' कोणत्या मार्गानें जावें हा तुमचा प्रश्न होता कीं नाहीं? त्यावर त्यांनीं, "आलांत त्या मार्गानें जा" असें उत्तर त्यांनीं दिलें. त्याचा अर्थ हाच कीं, तुम्हीं शोध करून, विचार करून हा 'मी' कोठून आलों, याचा शोध लावला म्हणजे तुम्हीं मोक्षाचे मालक व्हाल. मोक्ष तुमच्या पदरांत पडेल!

शांति! मनाची शांति हेंच प्रत्येकाचें ध्येय व प्राधान्य असावें. व्यक्तीला किंवा समाजाला उन्नतीसाठीं शांतीची जोड झाली पाहिजे. तिची जोड झाल्याशिवाय

तुमच्यातील मळ जाणार नाहीं व तुम्हांला जरूर असलेलें पावित्र्य प्राप्त होणार नाहीं. शांति ही महान् शक्ति आहे.

गुरुकृपा ही नेहमी तुमच्या सान्निध असते. ती कुठेंतरी तुमच्यापासून दूर आकाशांत नाहीं तर आणखी कुठें तरी आहे अशी तुमची कल्पना. ती मग खालीं उतरते. तसें नाहीं. गुरुकृपा तुमच्याजवळ तुमच्या अंतरंगात वास करीत आहे ! तुम्हीं स्वतःला विसरा. मन एकाग्र करा. आणि मग पहा. ती कृपा उफाळून आपो-आप वर येते.

भक्तानें एकेक पायरी चढतां चढतां विशिष्ट पायऱ्यापर्यंत पोहोंचावें लागतें. त्या उच्चतम ज्ञानाचा स्वीकार करण्याची त्यांच्यांत लायकी यावी लागतें. भक्ताची तळमळ, त्याची उत्कंठा, त्याची आतुरता शिगेला पोहोचावी लागते. मग ज्या देवाची तो भक्त आराधना करीत असतो तो देवच गुरूच्या रूपानें त्याच्यापुढे येऊन 'दत्त' म्हणून उभा रहातो. आणि त्याला पुढच्या मार्गाला लावतो. तो काय सांगतो ? अरे वेड्या ! देव देव म्हणून कशाला ही धांवाधांव ! देव का तुझ्यापासून दूर आहे ! देव तुझ्यांतच वास करून राहिला आहे. तूं आंत प्रवेश कर आणि त्याला शोध म्हणजे तो तुला दिसेल.

**देव, गुरू आणि तुझा आत्मा हीं एकच आहेत.**

कृपा ती कुठें आहे ? तिचें वास्तव्य तुझ्याच ठायीं आहे. ती जर तुझ्याबाहेर असती तर तिचा कांहीं उपयोग झाला नसता. दुसऱ्यांकडून मिळवायची अशी ही गोष्ट नाहीं. तिचें वास्तव्य स्वतःच्या ठायीं आहे याची तुम्हांला जाणीव होणें ही गोष्ट फार महत्त्वाची आहे. तिचें छत्र तुमच्या मस्तकावर अहर्निश आहे. तिचे कार्य अखंड चालू असते. ती सदासर्वकाळ तुमच्या सन्निध असतें. तिचा भास तुम्हांला होत नाहीं. याचें कारण तुमचें अज्ञान. ती उगाच नाहीं वाटेल त्याला उमगत. त्यासाठी श्रद्धा आवश्यक आहे. श्रद्धेच्या बळावर तुम्हीं तिचा शोध लावूं शकाल. श्रद्धा, कृपा, प्रकाश, आत्मा हीं सर्व एकमेकांशीं चिकटलेली आहेत. तीं विभिन्न नाहींतच.

देवकृपा ही आरंभीं असते, मध्यें असते व शेवटींही असते. ती तुमच्याठायीं अंतर्भूतच आहे. शरिराशीं ती एकजीव झाल्यामुळें तिचा भास किंवा प्रत्यय तुम्हांला येत नाहीं. गुरूच्या दृष्टीला ती दिसते. आत्मा हा सर्वत्र एकच एक आहे. तोच काय तो अविनाशी आहे हें गुरू तुम्हांला सांगतो व पटवून देतो. कृपेचा उगम कुठून होतो ? त्या आत्म्यापासूनच.

मोठ्यांत मोठी कृपा कोणती समजावयाची ? मौन, निर्मळ मौन की जें फार दुर्लभ आहे. मन सर्व व्यापांपासून शांत राखतां येणें ही केवढी मोठी गोष्ट आहे ? अध्या-त्मिक मार्गदर्शन करणारी तीच आहे. इतर मार्गदर्शनें तिच्यावर अवलंबून आहेत.

त्यांना तेवढें महत्व नाहीं. शांत रहातां येणें हें सर्वांत महत्वाचें आहे. गुरु न बोलतां शांततेच्या हत्यारानें आपलें कार्य करीत असतो. तुम्हांला जाणीव होऊं न देतां तुमची मनःशुद्धि तो घडवून आणतो.

मौन ! या मौनाचें महत्त्व शब्दातीत आहे बरें ! त्यांतच अपरंपार वक्तृत्व आरपार भरलेलें असतें. मौन 'सर्वत्र साधनम्' असें म्हटलें आहे. मौन म्हणजे कोणत्याही गोष्टीवर पूर्णपणें लक्ष केंद्रीभूत करणें. ज्याला मौन साधलें त्याला कोणतीही सिद्धि अवघड नाहीं. मौन साधतां येणें हीच सर्वांत मोठी सिद्धि आहे.

जिव्हेनें बोलणे किंवा कोणताही विचार मनांत येऊं न देणें, हें मौन. मनाला शरण आणणें हें फार कठीण कर्म आहे. मौन म्हणजे काय समजतां ? ते अखंड बोलणेंच आहे, व्याख्यानांची झोड उठवून हजारों लोकांची करमणूक करतां येईल. परंतु त्याची सुधारणा घडवून आणतां येणार नाहीं. उलटपक्षीं मौन आपला जरूर तो हेतु साध्य करून देतें. त्याचें मूल्य शाश्वत स्वरुपाचें आहे व सर्व मानव जातीची सुधारणा घडवून आणण्याचें सामर्थ्य मौनांत आहे. मौन म्हणजे हृदयाला जाऊन भिडणारे व हृदयाचा भेद करणारे वक्तृत्व. मौनासारखी हृदयभेदी दुसरी भाषा नाहीं.

मौन चार प्रकारचें आहे. जिव्हेचें मौन, डोळयांचें मौन, कानांचे मौन व मनाचे मौन हें सर्वांत महत्वाचें आहे. तें साधतां आलें पाहिजे.

---

# गुरु आणि शिष्य

गुरु—तुम्हांला प्रकाश कोणत्या साधनांमुळें मिळतो ?

शिष्य—दिवसा सूर्यामुळें व रात्रीं दिव्यामुळें.

गुरु—तुम्हांला प्रकाश दिसतो तो कोणत्या साधनाच्याद्वारें.

शिष्य—डोळ्यामुळें.

गुरु—डोळ्यांत प्रकाश असतो म्हणून तुम्ही प्रकाश पाहू शकतां; परंतु डोळ्यांत प्रकाशाचा प्रवेश कोणामुळें झाला. ?

शिष्य—तो प्रकाश म्हणजे ज्ञानाचा. ज्ञान चक्षमुळें आपण पाहूं शकतो.

गुरु—तें ज्ञान प्रकाशांत आणणारा कोण ?

शिष्य—तो म्हणजे 'मी'

गुरु—याचा अर्थ हाच कीं, तुम्हीं प्रकाशाचे प्रकाश—सर्वश्रेष्ठ प्रकाश आहांत असाच झाला नाहीं का?

शिष्य—होय तसा मी आहें, हें आतां मला पटलें.

—श्री रमण महर्षि

# खरें सुख कशांत आहे ?

मनुष्यप्राणी आपल्या कल्पनाशक्तीनें आपला देव निर्माण करीत असतो. ह्याचें प्रत्यंतर हें आहे कीं ह्या जगामध्यें परमेश्वराच्या सत्यस्वरूपाशिवाय आपणाला त्याची अनेक भीषण व बीभत्स अशींहि स्वरूपें पहावयास मिळतात. हें जसें खरें आहे तसेंच देवानें आत्मवत् मनुष्याला उत्पन्न केलें आहे हेंहि खरें आहे. कारण त्याच्या ठिकाणीं जे गुण आहेत ते अंशतः प्रत्येक मनुष्यप्राण्यामध्यें असलेले आपण पहातों, अशी वस्तुस्थिती असल्यामुळें मनुष्याच्या ठिकाणीं असणाऱ्या गुणांचें कौतुक करणें हें आपणांला हितप्रद आहे. तसें जर आपण केलें नाहीं तर परमेश्वराच्या ठिकाणीं असणाऱ्या गुणांचें कौतुक करणें व त्यांचें अनुकरण करणें आमच्या हातून होणार नाहीं.

बालपणीं आपणांपैकीं पुष्कळांना जें ईश्वरविषयक शिक्षण मिळालें किंवा मिळालें नाहीं त्यामुळें किंवा त्याच्या अभावीं, आमची देवाविषयींची कल्पना अपुरी होती. आमचा बालपणचा देव साधारणपणें चांगला समजला जाणाऱ्या माणसापेक्षां चांगला नव्हता. तो मत्सरी होता, हेवेखोर होता, नवसाला पावणारा होता; त्याला आमच्याचप्रमाणें स्नान, गंध धूप, दीप दक्षिणा इत्यादिकांची आवश्यकता असे. त्या देवाची व आमची आतां ताटातूट झालेली आहे. आतां आमचा देव हा विवेकग्राह्य आहे. तो सत्य व प्रेमस्वरूपी आहे. पतितपावन व मानवहितकर्ता आहे. देवाविषयींच्या आमच्या पूर्वीच्या व हल्लींच्या कल्पनेंत जमीन अस्मानाइतकें अंतर पडलें आहे.

देवाचें जें स्वरूप आम्हाला योग्य व खरें वाटतें व ज्या स्वरूपाचा आम्हांला वारंवार अनुभवहि येतो त्या स्वरूपाच्या एका भागावर द्यावा तितका जोर दिला जात नाहीं. तो भाग म्हणजे त्याचें प्रेमस्वरूप होय. देव प्रेमस्वरूपी आहे. तो मोठा दाता आहे. पण मागणारा नाहीं. मनुष्य पापी असो किंवा पुण्यवान् असो, गरीब असो वा श्रीमंत असो, तो सर्वांवर सारखें प्रेम करितो. सर्व त्याला समान आहेत व सर्वांवर त्याच्या प्रेमाचा वर्षाव होत असतो. आम्ही आपल्याला तुच्छ समजतो व आमची कधींतरी उन्नति होईल काय असा स्वतःविषयीं संशय प्रदर्शित करतों. पण हा विचार देवाला केव्हांहि स्पर्श करीत नाहीं. तो मानवजातीचें हित साधण्यांत सदासर्वदा रत असतो. साधुसंताची चरित्रें पाहिली

तर तेहि ह्या बाबतींत परमेश्वराचे अनुकरण करीत असलेले आपणांस दिसून येतात. ख्रिस्तानें व तुकारामानें आपलें जीवित परहित साधण्यांतच खर्ची घातलें.

जगाकडे दृष्टि दिली असतां आपल्याला एक गोष्ट प्रामुख्यानें दिसून येते ती ही कीं सर्वजण सुखासाठीं धडपड करीत आहेत. लहान मुलांना मोठें होऊन संसार थाटावयाचा असल्यामुळें त्यांनीं सुखकारक गोष्टींसाठीं धडपड करावी हें अगदीं रास्त आहे. पण मोठी माणसेंहि सुख नाहीं म्हणून टाहो फोडीत असतांना पाहिलीं म्हणजे आश्चर्य वाटल्यावांचून राहत नाहीं. पहावें तिकडे मनुष्याच्या चेहऱ्यावर काळजीनें आलेले गांभीर्यच दिसतें. परमेश्वराच्या नियमाप्रमाणें कोणतीहि स्थिति कायमची टिकणारी नसते. वर्षाचे ज्याप्रमाणें अनेक ऋतु असतात किंवा दिवसाचे जसे सकाळ, माध्यान्ह, सायंकाळ व रात्र असे भाग आहेत, त्याचप्रमाणें एकंदर मानवी जीवनाची स्थिति आहे. प्रत्येक स्थितीचें कार्य झालें म्हणजे ती नष्ट व्हावी अशी देवाची योजना आहे. मग मोठेपणीं बालपणींचीं किंवा तारुण्यांतलीं सुखें नष्ट झालीं म्हणून वाईट कां वाटावें ? त्यावद्दल दुःख कां ? अर्भकांना दांत नसतात. त्यांची जरुरी भासूं लागली म्हणजे ते येतात. कार्य झालें म्हणजे पडतात. मग ते नाहींसे झाले म्हणून त्यांत वाईट वाटण्यासारखें काय आहे ? आपणांला ज्यांमुळें सुख मिळतें अशी जी देहाची स्थिति ती गेली तरी नेहमीं सुख प्राप्त करून घेण्याचा एक मार्ग आपल्याला मोकळा असतो, तो केव्हांहि बंद होऊं शकत नाहीं. उलट जसजसें वय व अनुभव वाढत जाईल तसतसें त्या मार्गाचें अवलंबन केलें असतां अधिकाधिकच सुख मिळतें. तो मार्ग म्हणजे परहितसाधनाचा होय. ह्याचा महिमा मोठा आहे. हें कसें व केव्हां साधावें ह्याविषयीं नियम ठरवितां येणार नाहींत. तरी पण त्याला पूर्व तयारी पाहिजे. बुद्ध, ख्रिस्त व तुकाराम हे लहानपणींच ह्या कार्याला लागले नाहींत. परमेश्वराच्या उपासनेनें आध्यात्मिक बळ मिळविल्यावर त्यांनीं हा सुखाचा व कर्तृव्याचा मार्ग स्वीकारला. आज आपल्या देशांत शाळेंतील व कॉलेजांतील विद्यार्थ्यांना मातृभूमिहित साधण्यासाठीं आपला अभ्यास सोडण्यासाठीं जें निकराचें आव्हान केलें जात आहे तें मात्र सर्व दृष्टीनें घातक आहे. "**ब्रह्मज्ञान नव्हे लेंकुरांच्या गोष्टी**" हें जसें खरें आहे तसेंच परहितसाधन व तेंहि मोठ्या प्रमाणावर. ही लेकरांनीं करावयाची गोष्ट नव्हे. त्या कामीं, यश येण्याला मोठी पूर्व तयारी पाहिजे. नाहींतर तो पोरखेळ होईल. ह्या मार्गाचा स्वीकार करून अक्षय सुखाचा मार्ग मोकळा करणें हें मोठ्या माणसाचें काम आहे. परहितसाधनाचे मार्ग जसे वेगवेगळे आहेत तशीं साधनेंहि भिन्न आहेत. परंतु हा पैशाचा किंवा साधनांचा प्रश्न नसून अंतःकरणाच्या मोठेपणाचा आहे.

परहितसाधनांची व स्वार्थत्यागाचीं कामें करीत असतां पुष्कळदां अत्यंत कडू असा अनुभव येतो. “ ज्याचें करावें बरें तो म्हणतो कर माझें खरें ” ह्या म्हणीची अनेक वेळां प्रतीति येते. ज्याचें पुत्राप्रमाणें पालनपोषण करावें तोच लहान बंधु आपली नालस्ती करण्याला कारण होतो. ज्यांच्यासाठीं आपण आपला जीव व सर्वस्व खर्चीं घालण्यास तयार व्हावें, तींच माणसें आपल्याशीं कृतघ्नपणें वागून एकंदर मनुष्यस्वभावाचा तिटकारा आणतात. ज्याला दूध पाजावें तो सर्प उलट हाताला दंश करतो ! पण ही स्थिति सर्वसाधारणच आहे. देव आपल्यावर प्रेमाचा वर्षाव करतो पण त्याच्याशीं आपणांपैकीं किती जण कृतज्ञतेनें वागतात बरें ! सर्वत्र हाच अनुभव असल्यामुळें त्यांच्या कडूपणानें कंटाळून न जातां प्रत्येकानें परिहितसाधनांचें कार्य करीत असावें. हाच देवपूजेचा राजमार्ग आहे. एका भगवद्भक्तानें म्हटलें आहे कीं “ पाहिजे तर परमेश्वराची स्तुति करूं नको, पण मनुष्यावर उपकार केल्याविना राहूं नको. ” ही उक्ति अत्यंत मौल्यवान आहे. आम्हीं ज्या मनुष्यांमध्यें वास करतों त्यांच्यावर प्रेम करणें एवढें जर आमच्या हातून होणार नाहीं, तर ज्या देवाला आम्ही चर्मचक्षूंनीं पाहूं शकत नाहीं, त्याच्यावर प्रेम करणें आम्हांला कसें साध्य होईल ? बंधुप्रेम हेंच सुखाचें खरें साधन व त्यांतच खरें सुख आहे. परमेश्वर निःस्वार्थ-बुद्धीनें मानवहित साधीत असतो. त्याचेंच अनुकरण केल्यानें आम्हांलाहि खरें सुख प्राप्त होईल.



मनुष्य कितीहि विद्वान असला तरी जोपर्यंत त्याच्या विद्वत्तेचा जीवनाशीं मेळ बसत नाहीं, तोपर्यंत त्यास सुसंस्कृत म्हणतां येणार नाहीं.

हृदयाचें शिक्षण हेंच खरें शिक्षण. अंतःकरणांत जर शुद्ध प्रेम निर्माण झालें तरच बाकी प्राप्त होईल,

—महात्मा गांधी

# गीतेचा व्यावहारीक उपयोग

लेखक : वि. के. छत्रे

## ( उत्तरार्ध )

(७) वर्ते जसा श्रेष्ठ तसेचि सारे
आदर्श त्या मानुनि चालती रे ॥ ३-२१

अधिकारी प्रामाणिक असेल तर हाताखालचे लोकेंही तसेंच प्रामाणिकपणानें वागतील. अधिकारी लांचखाऊ असेल तर नोकरही त्याचाच कित्ता गिरवतील.

घरांतील वडील माणसांचें अनुकरण लहान मुलें नेहमीं करीत असतात. म्हणून वडील माणसांवर फार जबाबदारी असते. वडील निर्व्यसनी, कष्टाळू, सच्छील व परोपकारी असतील तर मुलांसही तसेंच व्हावेसें वाटेल. याउलट वडिलांच्या तोंडून शिव्या नेहमीं ऐकूं येतील, दुसऱ्यांना कसें मी गंडवले याच्या गोष्टी त्यांच्या तोंडून कानावर येतील, तर मुलगाही तसेच उद्योग करूं लागेल.

राष्ट्रांतील वरिष्ठ जागेवर बसणारे लोक यासाठीं स्पष्टवक्ते, सत्यवक्ते, बोलतील तसें करणारे, व चारित्र्य संपन्न असावयास हवेत. तसे ते नसतील तर राष्ट्र अधोगतीस गेल्यावांचून राहात नाहीं.

(८) जुना अज्ञ कर्मीत गोडी स्वभावें
चळे बुद्धि त्यांची असे ना करावें ३-२६

सोळा सोमवारचें व्रत पत्नी घेत असेल तर तिला तें घेऊं द्यावें. त्यानें शरीरशुद्धि व मनोनिग्रह साधेल.

बुद्धिभेद करण्यापासून हानि होते. ज्याची बुद्धि भ्रष्ट झाली त्याचेकडून उन्नतीसाठीं कोणताही यत्न होऊं शकत नाहीं.

एकदां रस्ता चुकतो आहे असें आपल्याला वाटलें तर त्याला योग्य मार्ग दाखवितांना त्याचें मत युक्तीनें वळवून घेणें अवश्य आहे. तेवढें सामर्थ्य आपल्या अंगीं नसेल तर आपण दुसऱ्याच्या लुडबुड्यामुळें इतो भ्रष्ट स्ततो भ्रष्ट : अशी त्या बिचाऱ्याची अवस्था व्हवयाची.

(९) स्वचित्ता परधर्म पंडुकुमरा, वाटो कितीही भला ।
त्याहुनी गुणहीनही तरी बरा निःशंक तो आपला ३-३५

सोनारानें सोनाराचेंच काम करणें चांगले. चर्मकारानें चर्मकारच व्हावें. गवळ्यानें गवळ्याचा धंदा करण्यांतच त्याचें व समाजाचेंही कल्याण आहे. सोनार,

चर्मकार अगर गवळी जर पंतोजीचें काम मानाचें असें समजून ते करूं पाहील तर जन्मजात पंतोजी इतक्या यशस्वीपणानें तें करूं शकणार नाहीं. स्त्रियांनीं घर सांभाळणेंच चांगलें. घर, मुलाबाळांची आबाळ करून चैनीसाठीं जर ती नोकरी करील, महिलामंडळांत व्याख्यानें झोडील, तर ती आपल्या कर्तव्यास चुकली असें होईल. खाण्याचें काम जिभेनें दातांनींच केले पाहिजे. पोटावर जिलेबी, लाडू ठेवून शरीराचें पोषण होणार नाहीं. आपलें जन्मजात काम करण्यांतच व्यक्तीचें व पर्यायानें समाजाचें स्वास्थ्य टिकतें. आज सुद्धां जें समाजस्वास्थ्य टिकलें आहे तें वाणी, शिंपी, सोनार, चर्मकार वकील, डॉक्टर आपापले पिढीजात धंदे चालवितात म्हणूनच. ब्राम्हणांनींच फक्त आपला उपाध्यायपणाचा व्यवसाय सोडून देण्यास कधींच सुरवात केली आहे. त्यामुळें आणखी कांहीं वर्षांनीं चांगला वेदशास्त्रसंपन्न ब्राम्हण मिळणेंही अशक्य होईल.

(१०) जेव्हां जेव्हां जगीं लोपें धर्माचरण पांडवा।
अधर्म माजतो, जन्म स्वयें मी घेई तेधवा। ॥
रक्षाया सज्जनां तेवी दंडायास्तव दुर्जनां ।
घेतों प्रतियुगी जन्म स्थापाया धर्म अर्जुना ॥

सदाचरणीं माणसांस संकटांतही आपले सदाचरणाचें व्रत चालविण्यास हा एक चांगलाच दिलासा भगवंतांनीं दिलेला आहे. मनुष्य केवळ अन्नावर जगत नाहीं तर तो श्रद्धेवरहि जगतो.

(११) संपादि ते ज्ञानि-जनांकडूनी
सेवूनि शंका पुसुनी नमूनी । ४-३४

ज्ञान मिळविण्याचा उत्तम मार्ग येथें दाखविला आहे.

(१) सेवाचाकरी करून कलावंतांकडून गायनासारखी कला हस्तगत करण्यासाठीं गुरुजींची निरलस सेवा करावी लागते. नुसत्या फीवर ठेवणींतल्या चिजा शिष्याला मिळत नाहींत. सेवेनें गुरु प्रसन्न झाला तरच त्या मिळावयाच्या. अर्थात् घेतलेला पाठ उत्तम रीतीनें पचवून दाखविणें हाही गुरूस प्रसन्न करून घेण्याचा एक मार्ग आहेच.

(२) ज्याला अभ्यासांत शंका येत नाहीं तो शिष्यच नव्हे. शंका विचारणारा शिष्यच गुरूला प्रिय होतो.

(३) नम्रता हा गुण तर शिष्याच्या अंगीं आधीं असला पाहिजे. उद्धट विद्यार्थ्यास कोणता गुरु 'गुह्य' ज्ञान देईल ?

(१२) जे पातकी या जगिं मोठमोठे ।
त्यांच्याहूनीही तव पाप मोठें ।
असो; तुला त्यांतुनि पैलतीर ।
नेईल ही ज्ञानतरीच वीरा ॥ ४-३६

पाप अज्ञानामुळें घडलें. केलेल्या पापाबद्दल खरा पश्चात्ताप झाला म्हणजें ज्ञानाची तळमळ लागते. तळमळींतून मार्ग सांपडतो गुरु मिळतो. व त्यापासून खरें ज्ञान झालें म्हणजे पुढें आणखी पातक घडत नाहीं. वाल्या कोळयाच्या हातून अज्ञानामुळें वाटमाऱ्याचें पाप घडत होतें. नारदमुनीची गांठ पडल्यावर खरें ज्ञान होऊन त्याचे डोळे उघडले व तपश्चर्येनें तो वाल्मीकि ऋषी झाला. पश्चात्तापामुळें केलेल्या पापापासूच माणूस मुक्त होतो.

( १३ ) न सुख शंकाकुल मानसाला ४–४०

उत्तरपत्रिका लिहिणारा विद्यार्थी शंकेखोर असेल तर तो त्या परीक्षेंत उत्तीर्ण होणार नाहीं. लिहिलेलें खोडील, पुन्हां दुसरें लिहिल, मग पहिलेंच बरोबर वाटून दुसरें खोडून पुन्हां पहिलेंच उत्तर लिहिल, असें जर विद्यार्थ्यानें केलें तर ती चिता-रलेली उत्तर पत्रिका पाहतांच परीक्षक अप्रसन्न होईल व ती उत्तर-पत्रिका तपा-ण्याचा त्यास कंटाळा येईल. शंकेखोरपणामुंळ त्याचा बराच वेळ फुकट जाईल व बरोबर उत्तरें माहीत असूनहि तीं सर्व लिहिण्यास वेळ उरणार नाहीं.

भातांत पाणी बरोबर घातले कीं नाहीं म्हणून शंकेखोर मुलगी जर पांच पांच मिनिटांनीं भात उघडून पाहूं लागली तर तो भात 'नामांकितच' व्हाव-याचा.

रेल्वेच्या तिकीट देण्याच्या खिडकीवरील मास्तर पैसे घेतांना परत देतांना व तिकीट देतांना स्थिर बुद्धीचा नसेल तर गर्दीच्या वेळीं उतारूंना वेळेवर तिकीटें मिळावयाची नाहींत. गोंधळ माजेल व ते त्या मास्तरची 'रेवडी' उडवतील. आपण करतों तें बरोबर आहे, असा एक आत्मविश्वास असावा लागतो.

आज रामाची भक्ती, उद्यां शंकराची तर परवा गणपतीची अशी चंचल भक्ती करणाराला कोणताच देव कधींच प्रसन्न व्हावयाचा नाहीं.

( १४ ) बा ! आपणा आपण उद्धरावें
अधोगतीला न कदापी न्यावें
बंधु स्वतांचा नर कीं स्वतांच
शत्रु स्वतांचाहि तसाच साच ॥ ६–५

लहानपणीं शरीरसामर्थ्य व विद्या संपादन करण्यांत जो आळस करील त्याला मोठेपणीं ऐश्वर्य मान कीर्ति यापैकीं कांहीं एक मिळणार नाहीं. कोणतीही विद्या संपादन कर-तांना कष्ट ज्याचें त्यानें करावयाचे असतात. गुरुचें काम फक्त मार्गदर्शनाचें. पोहो-ण्यास शिकतांना हातपाय ज्याचें त्यानेंच पाण्यांत जाऊन हालवावयाचें असतात. नाकातोंडांत पाणी गेलें तरी प्रयत्न सोडावयाचा नसतो तेव्हां पोहावयास येतें.

पंक्तीत फार आग्रह झाल्यामुळें लाडू खाऊन एक जण आजारी पडला. तेव्हां

आग्रह करणारांवर त्यानें ठपका ठेवला. त्यावर ते म्हणाले ' आम्ही लाख तुला आग्रह केला. आपल्या शरीरास किती लॉडू पचवितां येतील हे तुझें तूंच पहावयास पाहिजे होतें. आम्हीं कांहीं तुझ्या तोंडांत ते कोंबले नाहींत ! आपुला आपण वैरी ! तसाच मित्रही. मोठ्या पदास चढलेल्या लोकांनीं रात्रंदिवस करून स्वत; जिवापाड कष्ट केले. प्रसंगीं मोह मोठ्या धैर्यानें आंवरला. तत्व सोडलें नाहीं, मानापमानाची क्षिति बाळगली नाहीं, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. ते स्वतःचे खरे मित्र होते.

(१५) खाई बहु, खाईच न, झोंपाळू झोंप घेचि ना कांही।
हा योग सिद्ध त्याला, पार्था होणार सर्वथा नाहीं ॥ ६–१६

शरीर कार्यक्षम व निरोगी ठेवण्यासाठीं आहार, विहार व निद्रा हीं नेहमी प्रमाणांत ठेवावयास हवींत. कमीही होतां उपयोगी नाहीं व प्रमाणाबाहेरही जातां कामां नयेत. जेवल्याबरोबर बाहेर कुठें कामाला जावयाचें असलें तर आकंठ न जेवतां बेतशीर जेवण घेतलें तरी पोट दुखतां आळस झोंप न येतां—आपण आपलें काम व्यवस्थित करूं शकतों. हा अनुभव पुष्कळांना असेल. All play and no work हें जितकें वाईट तितकेंच All work and no play वाईट.

(१६) चंचलनि दांडगें मन निःसंशय हें जरीं महाबाहो।
अभ्यासानें आणिक वैराग्यें सहज तेंचि वळतें हो ॥

मन चंचल असलें तरी अभ्यासानें आणि वैराग्यानें तें हळूंहळूं ताब्यांत आणतां येतें. परीक्षा जवळ आली असताना सिनेमा चांगला लागला असला तरी तो पाहण्याचा मोह एकदां विचारपूर्वक बाजूला सारला कीं पुढल्या खेपेस, मनाची विशेष ओढाताण न होतां तो मोह आवरतां येतो. मनाला आपण आंवरूं शकतों हा एक आत्मविश्वास जागृत होतो हा आणखी एक लाभ पदरांत पडतो. मोहाचे वेळीं मनापुढें दोन्ही गोष्टी फायदे व तोटे मोजावेत व तोटे जास्त दिसले कीं मनाची समजूत होते व तें चूप बसतें.

(१७) दुर्गति शिवकर कर्मे करि त्याला ही नकोचि कीं वार्ता ६–४०

जो शुभ कर्म करतो त्याचा अधःपात कधींही व कोणत्याही प्रकारें होत नाहीं. आज केलेला अभ्यास उद्यां पुढें चालवण्यास उपयोगी पडतो. नेहमीं सत्याचाच जय होतो तसा नेहमीं सत्कर्मी माणसाचाच जय होतो. कचेरींत इमानें इतबारें कष्ट करणाराचें अधिकाऱ्यावर नेहमीं वजन असतें. मन लावून अभ्यास करणारा विद्यार्थी परीक्षेस पास व्हायचाच.

(१८) मातेंचि अंतःकालीं स्मरतो जो सोडुनी इथें देह।
जातो तो मद्रूपा पावे, पार्था न यांत संदेह ॥ ५

निद्रा हा एक मृत्यूचा लहान प्रकार आहे. दिवसभर मन चांगल्या विचारांत असेल तर स्वप्न पडलें तर चांगलेंच पडेल. दुसऱ्याचा नाश करण्याच्या विचारांत

असेल. किंवा अशाच एकाद्या कुविचारांत तें असेल–तर स्वप्नही भयंकर पडेल.

(१९) सर्वही भूतांचा श्रेष्ट मी ईश्वर ( अभंग )
हें रूप साचार न जाणती।
मानवी हा देह धरिला म्हणून
मानतीच ते न मूढ मातें ॥ ९-११ ॥

माणूस पारखणें ही गोष्ट सोपी नाहीं, तो दिसतो तसाच नसतो. त्याला जवळून पाहिल्याशिवाय, त्यांच्या अंतरंगांत शिरल्याशिवाय त्याची पारख होत नाहीं. बुवाची पारख करणें असेल तर रात्रीं तो काय करतो हें गुप्तपणें पहावें. दिवसाच्या त्याच्या प्रवचनावरून त्याची पारख करणें कदाचित् चुकीचें ठरेल. मनुष्याची खरी किंमत त्याच्या निर्याणानंतर होते.

(२०) अनन्यभावानें एकनिष्ठ भक्त ९-२२

मज चिंतितात निशिंदिनीं [ मी संकटीं ॥ उणें पडे त्यातें तें तें पुरवितों, आणिक राखितों, ज्याची इमानें इतबारें आपण नोकरी करतो त्या धन्यास आपली काळजी असते. चुकार नोकरासच धनी संधि साधून काढून टाकतो : व संकटांत उपयोगी पडत नाहीं हा जगाचा व्यवहार आहे.

(२१) शुद्ध-चित्त भक्त पान किंवा फूल
जल किंवा फल अर्पी मज।
भक्तिभावें तें तें केलेलें अर्पण
करी मी सेवन आनंदानें ॥

एकाद्या सार्वजनिक कार्याला श्रीमंतानें दिलेले शंभर रुपये व गरीबानें दिलेली पावली सारख्याच योग्यतेची आहे. देणारा कोणत्या भावनेनें देत आहे याला महत्व आहे. किती देतो याला महत्व नाहीं. वरील उदाहरणांत श्रीमंतानें बराच वादविवाद घालून रागानें फेंकलेल्या शंभर रुपयांपेक्षां गरिबानें खुषीनें दिलेल्या पावलीची किंमत अधिक आहे.

(२२) पराही कोटीचा असो दुराचारी
अनन्यत्वें जरी भजे मातें।
साधूच म्हणावें खरोखर त्याला
निश्चयें लागला कीं सुपंथा ॥ ९–३०

बिघडलेला दुर्व्यसनी मुलगा पश्चात्तापपूर्वक घरीं परत आला तर खात्री पटवून घेऊन त्यास आश्रय देऊन सुधारावयास संधि आईवडिलांनीं दिली पाहिजे.

(२३) अधोगति माझ्या भक्ता न कदाही
प्रतिज्ञा माझी ही कुंतिसुता ॥ ९–३१

वरील क्र. २० ( ९–२२ ) श्लोकावरील स्पष्टीकरण यालाही लागू आहे.

( २४ ) विभूति योग. परमात्मा कोठें पहावा ?

तेजोगोलांत सूर्य, नक्षत्रांत चंद्र, स्थिर वस्तूंत हिमालय. नद्यांत भागीरथी जलाशयांत सागर. फार काय सांगावें ? जगांत जेथें ऐश्वर्य, प्रभाव अगर श्रीमंती यांनी युक्त तें परमेश्वराचेंच स्वरूप. १०–४१

(२५) द्यायास हवें म्हणुनी न करि उपकार त्या दिलें जाई ।
तें दान होय सात्विक, सत्पात्रीं सुस्थली नि जें समयीं १७–२०

देणें कर्तव्य आहे म्हणून ज्यांच्याकडून उपकार घेतला नाहीं अगर होण्याचा संभव नाहीं त्याला म्हणजे योग्य अशा माणसाला चांगल्या स्थळीं व वेळेवर जें दान दिलें जातें तें सात्विक. हे योग्यदान. उदा. महापुरांत अगर वादळांत निराश्रित झालेल्या माणसास अन्न, कपडे, रहावयास जागा देणें.

(२६) जो आपुल्या कार्मी रमूनी जातो
त्या श्रेष्ठ सिद्धी मिळतेच पाहीं

आपल्या वांट्यांला आलेल्या व्यवसायांत जो एकाग्र होतो तो त्यांत यशस्वी झाल्यावांचून राहात नाहीं.

(२७) स्वयेंचि योगेश्वर कृष्ण जेथें
तैसा धनुर्धारीहि पार्थ जेथें
ऐश्वर्य लक्ष्मी जय नित्य न्याय
तेथें वसे मन्मत हेंचि होय ॥

जेथें भगवंताचें अधिष्ठान आहे व जेथें बुद्धि युक्ती व पराक्रम आहे तेथें ऐश्वर्य, लक्ष्मी व स्थिर न्याय असणारच.

---

ए. आर. सावंत ॲन्ड ब्रदर्स

३६३, मंगळदास मार्केटसमोर, मुंबई नं. २. टे. नं. २२८४४

तयार कपडे, सर्व प्रकारची होजियरी तसेंच टॉवेल्स, चादरी व पडद्यांचें कापड मिळण्याचें एकमेव ठिकाण. होलसेल व रीटेलर्स

# श्री साईबाबा व चांदोरकरादि भक्त श्रेष्ठ

(ले. द. शं. टिपणीस)

## लेखांक १

## ज्ञान–अज्ञान–प्रास्ताविक

आज पर्यंत होऊन गेलेल्या सर्वसंतांपेक्षां श्री साईबाबा हे निराळे भासतात. आपापल्या कार्याच्या प्रचारार्थ कीर्तन, प्रवचन, काव्य वगैरे साधनांचा उपयोग बहुतेक संतांनीं केला आहे. अनेकांनीं उत्कृष्ट प्रतिभासंपन्न रसाळ अशी अध्यात्मिक काव्य रचना केली आहे. कित्येकांनीं देशभर फिरून अध्यात्मविद्येचा प्रसार केला आहे व लोकांना मार्गदर्शन केलें आहे. परंतु श्रीसाईबाबानीं यांतील कांहीं एक केलें नाहीं. हें एक त्यांचे वैशिष्ट्य आहे. त्यांनीं कधीं कोणाला गुरुउपदेश दिला नाहीं कीं अध्यात्मांतील कठीण समस्या कथा कीर्तनद्वारा उकलूनही दाखविली नाहींत. आपल्या भक्तांना जें कांहीं सांगावयाचे असेल तें साध्या व्यवहारीक भाषेत व जें कांहीं समोर घडत असेल त्याच्या आधारें ते सांगत असत. यामुळें वरवर श्री साईचरित्र वाचणाराला त्यांत कांहीं अध्यात्मिक विद्या असेल याची पुसटही कल्पना येणें कठीण आहे. यास्तव त्यांच्या साध्यासुध्या शब्दांमागें जो कांहीं अध्यात्मिक अर्थ असूं शकेल तो उकलून दाखविण्याचा प्रयत्न मागील अनेक लेखांतून केला आहे. आज या छोट्या लेखमालेंत बाबांच्या वरच्या वैशिष्ट्याला अपवाद असलेल्या एका गोष्टीचा विचार करणार आहें.

### बाबांची अध्यात्मिक चर्चा

चांदोरकरादि चारपाच भक्त श्रेष्ठ असें होते कीं त्याच्याबरोबर कांहीं वेळां बाबा एकांतांत आध्यात्मिक चर्चा करीत असत. चांदोरकर अध्यात्मांतील विचारवंत असल्यामुळें तें आपल्या शंका बाबांना विचारीत व बाबा त्यांचें समाधान करीत. एकादवेळ बाबा स्वतांच एकादा प्रश्न उपस्थित करीत व मग त्याची उकल ते आपल्या भक्तांना सांगत असत. यासंबंधींची माहिती श्री. साई सत्चरित्त अ. ३९ व अ. ५० मध्यें तसेंच श्री. संतक विदासगणू यांनीं श्री. साईबाबासंबंधीं लिहिलेल्या चार अध्यायांमध्यें प्रथांत केलेली आहे. त्याच्या आधारें यालेखातील विवेचन करण्याचा प्रयत्न केला आहे.

एकदा बाबांनीं सद्गुरुज्ञानाचा उपदेश करतो कीं अज्ञानाचा उपदेश करतो असा स्वतांच प्रश्न उपस्थित केला व नंतर त्याचें स्पष्ट व सुबोध विवेचन करून आपल्या भक्ताची समजूत पटवून दिली त्या ज्ञान–अज्ञानाविषयीं प्रथम विचार करा-

वयाचा आहे. परंतु या विषयासंबधी बाबाचे विचार समजण्यास उपयोगी पडणाऱ्या कांहीं गोष्टींचा विचार प्रथम करूं.

### एकी तेथें बेकी

मानवी बुद्धि मोठी चमत्कारीक आहे. चांगले व वाईट दोन्हीही घडवून आणण्याचें सामर्थ्य तिच्या ठिकाणीं आहे. ज्या बुद्धीनें नाना शोध लावून मानवी जीवन सुखसंपन्न व वैभवशाली करण्यास हातभार लावला आहे. त्याच बुद्धीनें मानवी जीवन व मालमत्ता यांचा सर्वस्वी नाश करणाऱ्या अॅटमबॉम आदी गोष्टी शोधून काढल्या आहेत. वाळवंटाचें उद्यान व उद्यानाचें वाळवंट करण्याची किमया तिच्या जवळ आहे. सापाचे गरळ ओकण्याची व देवाचें अमृत प्रसवण्याची शक्ति तिच्याठायीं आहे. कर्त्याप्रमाणें फिरणाऱ्या क्रियापदासारखी ती फिरते व नाचते. दुसरी गोष्ट अशी कीं बुद्धीला भेद करण्याची संवय आहे. एकी तेथें बेकी करण्यास ती टपलेली असते. तसेच बेकीची एकी करण्यासह ती साहाय्य करते राष्ट्राराष्ट्रांत सलोखा जसा ती निर्माण करते तसा एका घटकेंत बेबनाव घडवून आणून त्यांच्यांत वैर व द्वेषभाव निर्माण करते. एकीबेकीचा खेळ व चांगल्या वाईटाचा नाच करीत राहणें हें तिचें कार्य आहे. यामुळें ज्या ठिकाणी यांतील कोणतेही करता येत नाहीं तेथे ती थंड पडते. सत्य, सुंदर प्रेममय असें जें ब्रम्ह, ज्ञान वा चैतन्य त्याच्या ठायीं द्वैत वा अद्वैत मुळांत कांहींच नाहीं. ते सदैव आहे तसेंच असतें. त्यांत बदल होत नाहीं कीं त्याला आदी अंत नाहीं. अशा चैतन्यांत बुद्धिला एकीही करतां येत नाहीं कीं भेदही करतां येत नाहीं. कोणतें शस्त्र पाण्याचें तुकडे तुकडे करूं शकेल ? फार तर एकादी भिंत घालून दोन भागांत पाणी आहे असें भासवितां येईल. यामुळें दृष्टिला दोन तळीं दिसलीं तरी दोन्ही पाण्याचे गुणधर्म तेच. मग हें कार्य आणि तें कार्य एकच. अशा प्रकारचा भेद चैतन्याच्या, ब्रह्माच्या वा ज्ञानाच्या ठिकाणीं दाखविण्याचें कार्य बुद्धि आदि इंद्रियांच्या द्वारा माया करीत आहे. मायेनें निर्माण केलेली बुद्धि मायेच्या पसारांत खेळूं शकते. परंतु जें मायेनें निर्माण केलें नाहीं उलट मायेलाच ज्यानें निर्माण केले आहे त्याच्यापुढें बुद्धीची टाप चालत नाही. या ठिकाणीं बुद्धीची मति कुंठीत होते. यामुळें बुद्धीच्या द्वारा ज्ञान वा ब्रह्मज्ञान हे समजणें आकलन होणें शक्य नाही. खरें ज्ञान, ब्रह्मज्ञान हे आधिभौतिक ज्ञानाप्रमाणें नसून तें सत्यदर्शन आहे. जाणीव आहे. आनंद व प्रेममय स्थिति आहे. तिचा अनुभव घ्यांवयाचा असतो. एकाद्याच्या परिस्थितीचे खरेंखुरें आकलन ती परिस्थिति ज्यानें अनुभवली असेल त्यालाच होऊं शकेल. कोणत्याही गोष्टीचा अनुभव व स्वाद आपण आपल्या इंद्रियद्वारा घेत असतों.

### मानवी इंद्रियांची मर्यादा

परंतु मानवी इंद्रियें मर्यादीत आहेत. एकाच वेळीं सर्वच्या सर्व अनुभव ती घेऊं शकत नाहींत. आपले डोळे एकादी वस्तू एकाच वेळीं सर्वच्या सर्व पाहूं शकत नाहीं.

भाग भागांत आपण ती पाहूं शकतो.ताजमहाल पहायचा असेल तर प्रथम दर्शनी भाग आपल्या दृष्टीपंथात येईल. पण त्यावेळीं मागील बाजू वा आंतला देखावा दिसणार नाहीं. मागील बाजूस गेल्यावर ती दिसेल पण आंतील इतर भाग दिसणार नाहींत. आंत गेल्या वर आंतील दृश्य दिसेल. गाण्यांतील सर्व ओळी कांहीं आपण एकदम ऐकूं शकत नाहीं. एक ओळ ऐकूं शकूं तीही शब्दाशब्दाच्या टप्पानें अशा प्रकारे आपलीं ज्ञानेंद्रियें भागाभागांत अनुभव घेऊं शकतात. भागाभागांतलें हें ज्ञान एकत्रींत करून त्याचें एक चित्र वा कल्पना निर्माण करण्याचें काम बुद्धि करते. परंतु बुद्धिही चकवा असल्यामुळें तिने जें निर्माण केलें तें सत्य आहे असें मानून चालणें धोक्याचेंच आहे.

एकच गोष्ट चौघांनीं पाहिल्यास चौघांची बुद्धि चार तऱ्हेची चित्रें वा कल्पना निर्माण करू शकते. जितके मध्ये तितक्या चुली असा हा प्रकार आहे. आपल्या इंद्रि-यांना अशा प्रकारें मर्यादा आहे, कारण जिला मर्यादा ( Diamensions ) आहे अशीच वस्तू तीं अनुभवूं शकतात. तीन मर्यादेची (लांबी, रुंदी व जोडी) वस्तू आपण पाहूं शकतो. उचलू शकतो. दोन मर्यादा(लांबी, रुंदी) असलेली वस्तू आपण पाहूं पण उचलूं शकत नाहीं. उदाहरणार्थ छाया. एकच मर्यादा असलेली वस्तू आपण बुद्धिच्या साह्यानें कल्पनेनें जाणूं शकतों. तिचें प्रत्यक्ष अस्तित्व आपण दाखवूं शकत नाहीं. उदा-हरणार्थ रेषा. मग ज्याला मर्यादाच ( diamensions ) नाहीं त्याबद्दल आपली इंद्रियें काय करूं शकणार ? तीं त्याला पहाण्यास, स्पर्श करण्यास, ऐकण्यास, चाखण्यास पूर्ण हतबल आहेत, यामुळें ज्याला बाजूच नाहींत, ज्यांत भेद नाहीं व ज्यात भेद करतां येत नाहीं असें तें प्रेममय ज्ञान वा ब्रह्म वा चैतन्य जाणण्यास मानवी इंद्रियें लंगडी पडतात.

## ज्ञान आणि विजेचा दिवा

विजेचा दिवा लावतांना काय होतें ? बटन दाबणें व उजेड पडणें एकदम होत असतें. खरे ज्ञान होणें हे विजेचा दिवा लावण्यासारखें आहे. बटन दाबणें व उजेड पडणें यांत सेकंदाचा कांहीं अंश तरी अंतर असतो पण अज्ञान जाणें व ज्ञान होणें यांत कांहींच अंतर नाहीं. झोप जाणें व जागृति येणें यांत आधी कोणतें हे व मग कोणतें हे सांगणें कठीण. याला मर्यादा रेषा दाखवितां येईल काय ? अज्ञान जाणे व ज्ञान होणें या दोन्ही गोष्टी एकदमच होतात किंबहुना अज्ञान जाणें म्हणजेच ज्ञान होणें व ज्ञान होणे म्हणजेच अज्ञान जाणें होय.अज्ञान हे मायेचें कार्य आहे. तें मायेचें पटल आहे. माया ही ब्रम्हाची शक्ति आहे, ती आदी माया आहे. या दृश्य जगाची उत्पत्ती, स्थिति व लय करण्यासाठीं तीं ब्रह्मांतून निघाली आहे. ब्रह्मापासून ती निराळी करतां येत नाहीं. एका-द्याची ताकद त्याच्यापासून निराळी करून दाखवितां येईल काय ? गुळाची गोडी त्याच्या-पासून निराळी करतां येईल काय ? गुळ व त्याची गोडी ही जोडी अविभाज्य

आहे. हा सूर्य व ही त्याची प्रभा असें दोन स्वतंत्र स्पष्ट भाग दाखवितां येतील काय ? अनुभव घ्यायचा तर तो दोघांचाही घेतला पाहिजे व तो सुद्धां एकाच वेळीं एकदम म्हणून बाबा चांदोरकरांना सांगतात—

त्या चैतन्याची जी शक्ति । तीच माया निश्चितीं ।
तिने या चैतन्याप्रति ॥ ठायीं ठायीं नटविलें ॥ १३ ॥
परी निवड करूं जातां । वेगळी न होती सर्वथा ।
गुळ गोडी निवडितां । जैसी नाना न ये कीं ॥ १४ ॥
वा सूर्य आणि प्रभा त्यांची । पृथक करितान ये साची ।
तीच ब्रह्म आणि मायेची । आहे स्थिती चांदोरकरा ॥ १५ ॥
सूर्य आणि प्रभा जाण । शब्द जरी भिन्न दोन
परी प्रभा सूर्य मिळोन । सूर्य आला आकारा ॥ १६ ॥
सूर्य आपल्या प्रभेकरून । आपलेंच जगा करवितो ज्ञान ।
माया-ब्रह्मांत तो जाण । प्रकार आहे नारयणा ॥१७॥ श्रीसंतकथामृत अ.५७ दासगणू

म्हणूनच ई. वा. उपनिषद् म्हणते कीं उभयंसह दोन्ही एकदम जाणलीं पाहिजेत. ईश्वरांत जग व जगांत ईश्वर दोहोंची एकाच वेळीं जाणीव झाली पाहिजे. अज्ञानाला स्वतंत्र अस्तित्व नाहीं. तें ज्ञानाच्या आश्रयानें असतें. वास्तविक मुळांत ज्ञान व अज्ञान असें कांहीं नाहींच. मग काय आहे ? जें आहे असें वाटलें तें नाहीं एवढेंच. शब्दद्वारा वर्णन करतांच येत नाहीं. म्हणूनच नेति नेति म्हणतात. यामुळें ज्ञान कीं अज्ञान याच्या वादावादींत कांहींच अर्थ नाहीं. सूर्य आधी येतो कीं अंधार आधी पळतो याबद्दल डोकें पिकविण्यांत कांय अर्थ आहे ? म्हणून अज्ञान असा अर्थ करताच बाबा कोणताही आग्रह धरीत नाहींत. त्याचें म्हणणे एवढेंच कीं, आजपर्यंत ज्ञान असा शब्द घेतला गेला तें ठिकच झालें. पण अज्ञान असा शब्द घेतल्याने आपणास विषय समजण्यास सोपे जांत असेल तर तो घेण्यास काय हरकत आहे. ? ही गोष्ट लक्षांत घेऊन पुढें जो अर्थ बाबा सांगतील तो आपण ध्यानीं घेतला पाहिजें.

**ज्ञान व अज्ञान**

ज्ञान व अज्ञान यांचे विवेचन समजण्यास कांहीं इंग्रजी शब्द अधिक उपयोगी पडतील म्हणून या संबंधी थोडा विचार करूं. इंग्रजीत discover व invent असें शब्द आहेत discover म्हणजे जें आहे तें उघडे करणें, उघडदशेस आणणें. invent म्हणजे एकाद्या नव्या ( पूर्वी नसलेल्या ) वस्तूची युक्ति वा कल्पना काढणें. वास्कोडगामानें हिंदुस्थानचा शोध लावला ही Discovry आहे तर जेम्स वॅटनें वाफेचे इंजिन शोधून काढलें हें invention आहे. ज्ञान होणें

ही Discovery आहे. Iuvention नाहीं. ब्रह्माला मूळ चैतन्याला मायेने covery केलेली आहे, त्याला आच्छादिलें आहे. ते काढल्यावर सत्य उघड होतें त्याची जाणीव होते. अनुभव येतो म्हणजेच ज्ञान होतें. पण हें आच्छादन म्हणजे आपण व्यवहारांत समजतों तसें आवरण वा पडदा नाहीं. माया ही ब्रह्माचीच शक्ति आहे. दोन्हीं निराळी करतां येत नाहींत. मायेचे कार्य दुहेरी असतें. जें आहे तें लपविणें झाकणें व त्या ऐवजी जें नाहीं तें आहे असें भासविणें. यालाच आवरण, आच्छादन, पडदा असे शब्द बापरतों एवढेंच. वास्तविक भ्रम हा शब्द अधिक बरा ठरेल. एका भिकाऱ्यानें स्वतांला स्वप्नांत राजा झालेलें पाहिलें. या ठिकाणीं मायेनें प्रथम त्याचें भिकारीणपण लपविलें व त्या ऐवजीं राजेपण दाखविलें. अशाच प्रकारें जें मूळ सत्य तें लपवून त्या ऐवजीं हा नामरुपादि पसारा सत्य आहे असें माया भासवीत असते. यालाच आपण आवरण, पडदा असें म्हणतोंच तें काढून टाकण्यास सद्गुरू आपणास शिकवीत असतो. Sadgurn helps us to dicsover reality असें इंग्रजींत सांगितल्यानें अधिक अर्थबोध होईल असें वाटतें.

**राख काढून टाकावी लागते**

आरशावर धूळ पडून त्याचें आरसेपण झांकलें गेल्यावर त्यांत आपण स्वताला पांहू शकूं काय ? धूळ झटकून टाकली तरच आपलें रूप त्यांत स्वच्छ दिसेल. निखाऱ्यावरील राख काढली कीं आंत लपलेल्या अग्नीची आपणास जाणीव होते. अज्ञानाच्या धुळीखालीं, राखेखाली ज्ञान झाकले गेलें आहे. ही धूळ व राख आपण काढून टाकली कीं आपलें आत्मतेज आपणास दिसेल. तळ्यावर आलेलें शेवाळ बाजूस सारल्या खेरीज कां स्वच्छ पाणी हातीं येणार आहे ? मुळांत पाणी हें आहेच. शेवाळानें आच्छादिल्यामुळें 'तें आहे' हें आपण जाणत नव्हतो एवढेंच ज्ञान, चैतन्य वा सत्य मुळांत आहेच. त्याला आदी अंत नाहीं कीं नाशविनाश नाहीं. त्याला अज्ञानाचें आवरण आहे. मायेचें हें कार्य आहे जें सत्य तें झाकून टाकून जें असत्य तें सत्य असें ती भासवीत आहे. मायेची मोहिनी आपणावर आहे. यामुळें हें दृश्य जगत आपण सत्य मानतो. हें अज्ञान आहे देहालाच आपण मी समजतों हा देहाभिमान हें अज्ञान आहे. एकत्व झांकून अनेकत्व माया भासविते म्हणून मी तूं, माझे तुझें असें भेद करतो हें अज्ञान आहे. ईश्वर निराळा, सृष्टी निराळी, मी निराळा असें आपण समजतो पण तें अज्ञान आहे. सूर्याला राहूनें ग्रासावें तसें ज्ञानाला अज्ञानानें ग्रासलें आहे. ज्ञानाज्ञानाची ही भेसळ आपण निवडली पाहिजे. तांदूळ निवडतो म्हणजे आपण काय करतो ? खडे कीड वेंचून टाकतो तांदूळ कांहीं कोणी वेचत नाहीं. म्हणतों मात्र तांदूळ निवडतों. तसेंच ज्ञानाज्ञानाच्या भेसळींतून अज्ञान वेचून टाकलें कीं शुद्ध ज्ञान तांदुळाप्रमाणें आपोआप उरेल. म्हणून सद्गुरु अज्ञान शिकवतो. आपण म्हणतों मात्र ज्ञान शिकवतो.

## मायेची मोहिनी

मोहिनी विद्येच्या प्रयोगांत काय होतें? एकाद्याच्या मनांत मोहिनी विद्येच्या साह्याने तूं बादशाहा आहेस असें भरवून दिलें कीं मग तो बादशाहाप्रमाणें हालचाली करतो, बोलतो वागतो. त्याला कोणी कितीही सांगितलें कीं तूं बादशाहा नाहींस साधा माणूस आहेस तर तें त्याला खरें तर वाटत नांहींच उलट सांगणाऱ्यालाच तो वेड्यात काढतो. आपण बादशाहा आहोंत हें असत्य व साधा माणूस आहोंत हें सत्य हें त्याला केव्हां पटेल? मोहिनी काढून घेतल्यावर. तद्वत मायेच्या मोहिनीमुळें आपण झोपलों आहोंत व स्वप्नांत वावरत आहोत. सद्गुरु जेव्हां आपली झोप उडवील तेव्हांच आपण सर्व झोपी गेलेले जागे होऊं व आपण खरें कोण हें उमजूं. एकाद्या वेड्याला आपण शहाणे कसें करतों? त्याच्या डोक्यांत जें वेड शिरले आहे तें असत्य आहे,तो भ्रम आहे,वास्तविक तसें कांहीं नाहीं याची जाणीव त्याला आपण हरप्रयत्नें करून देतो,ही जाणीव त्याला झाली कीं त्याचें वेड जातें.वेड गेलें कीं तो शहाणा होतो. वेडेपण जाणें व शहाणपण येणें दोन्ही एकदमच होतात. वास्तविक आपण खरोखर वेडेच आहोंत. सद्गुरु तेवढे खरें शहाणें असतात. कारण ते सदैव जागृत असतात. हा दृश्य पसारा खरा आहे असें वेड आपल्या डोक्यांत मायेने भरविलें आहे. तूं सत्य समजतोस तें सत्य नसून वेड आहे अशी जाणीव सद्गुरुनें आपणास करून दिली कीं हें वेड जाऊन आपण खरें शहाणें होऊं म्हणजे आपणास ज्ञान होईल. खऱ्या सत्याचा अनुभव येईल. आतांपर्यंत दिलेल्या उदाहरणांमधील उद्देश साधण्यासाठीं ज्याप्रकारें क्रिया होते वा केली जाते कांहींशीं तशाच स्वरूपाची क्रिया ज्ञान होण्यास सद्गुरुला करावी लागते. यालाच बाबा अज्ञान शिकविणें म्हणतात. संत कबीरानेंही आपल्या एका पदांत हेंच सांगितलें आहे. सद्गुरुची महती सांगतांना ते म्हणतात "परदा दूर करै आँखिनका, निज-दर्शन दिखलावे ॥ तो (सद्गुरु) डोळ्यावरचा पडदा दूर करतो व आत्मस्वरूप दाखवितो.

## अर्थाचा अनर्थ केला जाऊं नये

आतांपर्यंत केलेल्या विवेचनामुळें बाबा पुढें जें कांहीं ज्ञान अज्ञानासंबधी सांगतील तें समजण्यास सोपें जाईल असें वाटतें. साक्षीदाराकडून सत्य काढून घेण्यासाठीं कोर्टामध्यें साक्षीदाराची तपासणी, उलट तपासणी व शेवटीं मुद्देसूद विवेचन अशी पद्धत उपयोगांत आणतात. त्याच पद्धतीचा उपयोग पुढील विवेचनासाठीं केला आहे. त्याचा विचार पुढील लेखांत करूं. पण एका गोष्टीचा उल्लेख केला नाहीं तर गैरसमज होण्याचा संभव आहे. म्हणून विषयांतराचा दोष पत्करून थोडे स्पष्टीकरण करणें जरूर आहे. आत्मज्ञान शब्दानें कधींही व्यक्त करतां येत नाहीं. त्याबद्दल बोलण्याचा वा लिहिण्याचा अधिकार साक्षात्कारी पुरुषास वा सद्गुरुस आहे. माझ्यासारख्या अज्ञानी व संसारी माणसानें असा


उपद्व्याप करणें थोडेंसें अयोग्य आहे एवढेंच नव्हे तर कच्चा मडक्याच्या अध्यात्मांतील असल्या उपद्व्यापानें गैरसमज होण्याचा पूर्ण संभव आहे त्याचें वर्णन शब्दानें देण्याचा प्रयत्न केल्यास अर्थाचा अनर्थ होणें शक्य आहे. असें असता व आम्ही कोणी अधिकारी पुरुष नसतां या विषयावर लिहावें हें गैर आहे असें कोणास वाटलें तर तें योग्यच होईल. तरीसुद्धां अध्यात्मांत जिज्ञासा निर्माण करण्यासाठीं असें करणें योग्यच ठरेल. जिज्ञासेंतूनच आर्तपणा निर्माण होतो. व भक्त आर्त झाल्याखेरीज त्याला ईश्वरदर्शन वा ज्ञान होत नाहीं. जिज्ञासा निर्मितीसाठीं शब्दातीताबद्दल लेखन वा वक्तव्य अध्यात्मांत जरुर असते. केवळ ह्याच उद्देशानें हें लेखन केलें आहे. जें लिहिलेंतेंच सत्य असा दावा वा हट्ट नाहीं. जें हृदयाला भिडेल तें सत्य समजून ग्रहण करावें व बाकीचे सोडून द्यावें अशी वाचकांस विनंती आहे.

---


## जनतेचें आरोग्य म्हणजेच राष्ट्राचें सामर्थ्य

**राष्ट्र सामर्थ्यवान बनविण्यासाठीं बलवान बना:**—यासाठीं लागणारी हरेक तऱ्हेची उपकरणें म्हणजे डंबेल्स्, लेझीम, मुगदुल, यासारखा सर्वश्रेष्ठ व उत्तम तऱ्हेचा माल बनविण्यांत येतो.

आम्ही कांदिवली टिचर्स ट्रेनिंग इन्स्टिटयूट, डि. स्कूल बोर्डें, जिल्हा परिषद, नगरपालिका, ग्रामपंचायती, व्यायामशाळा, विकास केंद्रें, याना माल पुरवितो. अधिक माहिती आणि कॅटलॉगसाठीं लिहा:...



**लक्ष्मीविजय वुडन आर्टिकल वर्क्स,** ८५ बापू खोटे स्ट्रीट, मांडवी मोहोल्ला, मुंबई ३

प्रोप्रायटर — डी. एच्. साखरकर

# क्षमा करण्यास शिकूं या

**क्षमा हा सद्गुण अंगीं आणण्याची आवश्यकता आहे, हा उपदेश सर्व देशाच्या व सर्व काळच्या साधुसंतांनीं केव्हांना केव्हां तरी केलेला आहे. मनुष्याच्या हातून चुकी होणें, हें अगदीं साहजिकच आहे; पण क्षमा करणें हा ईश्वरी गुण आहे; ही सर्व साधारण गोष्ट प्रत्येक दिवशीं अनुभवास येते.**

तुकोबांनीही आपल्या एका अभंगांत हा सद्गुण आपल्या जीवित्वाचा एक नियम करा, असें आपणास सांगितलें आहे. पण, आम्हांपैकीं पुष्कळजण असें म्हणतील कीं, क्षमा हा सद्गुण आपल्या जीवित्वाचा नियम करा असें, या संतांनीं आम्हांला सांगणें फार चांगलें आहे; परंतु संसारांत आम्हांला नित्य अनेक प्रकारचे व्यवहार करावयाचे असतात व येथें शिक्षा न करतां पापी मनुष्यांना सोडून दिले तर जगाची सेवा करण्याच्या आकांक्षेनें ज्याच्या मनावर पगडा बसविला आहे व आणखीही इतर थोर विचारांनीं ज्याचें मन प्रगल्भ झालेले आहे, व पूर्ण आत्मत्याग करण्याची ज्याचें अंगी पात्रता व शक्ति आहे असा पुरुष योग्य वेळीं सत्य तें बोलण्यास कधींही मागें पुढें पाहणार नाहीं, कारण त्याची पक्की खात्री असते कीं, असे केल्यानें शेवटीं मनुष्य सुपंथाकडेच जातो. परंतु आपण ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, आपल्या दररोजच्या व्यवहारांतही हीं तत्वें अमलांत आणिल्यानेंच आपल्या हातून मोठी कृत्यें घडणें शक्य असतें. यासाठीं थोर कृतीचे पोवाडे गाण्यांत आपल्या कालाचा व शक्तीचा व्यर्थ अपव्यय करण्याऐवजी हमेषच्या बारीक सारीक गोष्टींतसुद्धां आपल्या ध्येयास धरून वागण्याचा जर आपण प्रयत्न केला तर आपल्या आयुष्याचा आपण विशेष सदुपयोग केला असें होईल. मनुष्यजात ही वाईट आहे व मनुष्याचें अंतःकरण दुर्विकारांनीं भरलेलें असें म्हणण्यांत शोभील नाहीं. आपण स्वतः वाईट असतों व आपल्या चांगुलपणावर आपला विश्वास नसतो म्हणून आपणांस मनुष्यजात वाईट आहे असें वाटतें. औदार्य, दमन व धर्म या तीन तत्वांच्या पायावर तुमच्या आयुष्याची उभारणी झाल्याशिवाय तुमच्या अंगी भाव आहे असें म्हणतां येणार नाहीं. आपल्या शक्तिप्रमाणें गरीबांस मदत करावयाची. ज्यांच्यावर आपत्तीचा घाला पडला आहे त्यांना प्रेमाच्या शब्दानें धीर द्यावयाचा व आपलें ज्यांनीं नुकसान केलें असेल त्यांना क्षमा करावयाची. मनाच्या या वृत्तीला '**औदार्य**' म्हणतात. दमण म्हणजे स्वतःचे मनोधर्म, व इंद्रियें हीं आपल्या कह्यात ठेवावयाचीं. कारण ज्या कोणाची स्वतःच्या इंद्रियांवर सत्ता आहे. व त्यांना ज्यानें जिंकलें आहे, त्या मनुष्यालाच दुसऱ्यांना जिंकतां येईल. धर्म म्हणजे दुसऱ्यांच्या दोषांचें प्रदर्शन न करतां अनुकंपा वाटूं लागेल हे कांहीं सांगतां येणार नाहीं. आपणासारख्या साधारण लोकांनाच नव्हे,

तर ज्यांच्या बहुजन समाजाशीं व आयुष्यांतील व्यावहारिक सिद्धांतांशीं निकट संबंध येतो, अशा मुत्सद्द्यांना देखील गुन्हेगार लोकांना शिक्षा करण्याची जरूर भासत आहे, ते म्हणतात कीं, गुन्हेगाराची गय करून उपयोगाचें नाहीं, तर त्याचा त्यागच केला पाहिजे. ह्या जगाचा जो अनुभव, त्याचा साधूंच्या उपदेशाशीं मेळ बसतो किंवा नाहीं तें आपण पाहूं या. जो समाजाचा अपराध करतो, त्याला त्याच्या अपराधाबद्दल शिक्षा ही झालीच पाहिजे. ईश्वर हा जसा कृपाळू पिता आहे, तसाच तो शास्ताही आहे. जगाचें राज्य चालविण्याकरितां कायद्याची जरूरी आहे. जो त्या कायद्याचें उल्लंघन करितो, त्याला मग तें किती कां क्षुल्लक असे ना, शिक्षा ही होतेच होते. तुम्ही अज्ञानानें का होईना, आपलें बोट अग्नी मध्यें घातले तर अग्नीचा धर्म जो जाळण्याचा, त्याचप्रमाणे तुमचे बोट जाळणारच. सृष्टिनियमाचें अज्ञानानें जरी उल्लंघन झालें असलें तरी नियमाचें उल्लंघन केल्यामुळें होणारा जो परिणाम तो झाल्यावांचून राहात नाहीं, किंवा तेथें मग कांहीं तडजोडही होत नाहीं. याप्रमाणें सृष्टीचा नियम आहे. परंतु, दुसऱ्याही प्रकारचा एक नियम आहे व तो वरिष्ठ दर्जाचा होय. आपणांस दुःख होतें तें आपल्या ठिकाणीं एक प्रकारची जागृति उत्पन्न करण्यासाठींच होतें, असें जरी न मानिलें, तरी दुःखाच्याद्वारें आपल्याला जागृत होता येतें व आपण आपलें आयुष्य पुनः सुरू करावें आणि या आयुष्यांतील मार्गक्रमण करीत असतांना आपल्या वाटेमध्यें जे मोह, जे दुर्विकार उत्पन्न होतात, त्यांच्याशीं झुंजण्यास सज्ज व्हावें अशा सूचना आपल्याला होत असतात. म्हणून पापी मनुष्यास शिक्षा केली पाहिजे, असें जर मनुष्यनिर्मित नियम व कायदे सांगत आहेत, तर ह्याच मनुष्यास ताळ्यावरही आणलें पाहिजे ही आशा आध्यात्मिक सृष्टीचा नियम आपणामध्यें उत्पन्न करीत आहे. पापी मनुष्याला शाश्वतची शिक्षा कधीही होत नाहीं. मनुष्याचें अंतःकरण स्वभावतः दुष्ट नसतें. साधारणतः मनुष्यें जाणून बुजून किंवा स्वसंतोषानें चूक करीत नसतात, तर अज्ञानामुळें ती त्यांच्या हातून घडून येते. अंतःकरणांतून ईश्वरी अंश अजीबात नाहींसा झाला, असें सहसा होत नाहीं, हे तत्व आपण लक्षांत ठेविले पाहिजे.

परंतु पापी मनुष्यास वाटेवर जर आणावयाचे आहे, तर आपण स्वतः प्रथम मनुष्यामधील ईश्वरी अंश पहावयास सिद्ध असले पाहिजे. प्रत्येक मनुष्यामध्यें गूढरूपानें वास करणारा जो सत्त्वांश तो प्रथम आपण शोधून काढण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तो शोधून काढल्यानंतर आपली भूतदया आपण जर प्रकट केली तर पापाचे ढिगांचे ढीग रचलेल्या माणसांना देखील पुनः सत्पथावर आणितां येईल. म्हणून बुजून वाईट काम करणाऱ्या अशा दुष्ट मनुष्याचें आपण उदाहरण घेऊन आपण अशी कल्पना करूं या कीं कायद्यास अनुसरून त्याच्या गुन्ह्याबद्दल त्याला शिक्षा झाली आहे. आतां अशा मनुष्यावर क्षमेचा काय परिणाम होतो तो पाहूं या. आपण प्रेमानें त्याचा हात धरून त्याला म्हणूं या कीं, ' हे बंधू, तूं पाप केलें आहेस व त्याब-

द्दल तुला शिक्षाहि झाली आहे. परंतु तुजमध्यें ईश्वराचा अंश बीजरूपानें वसत आहे. व सत्वगुणाचें जें बीज तुझ्या अंतःकरणांत आहे, त्याची थोर वाढ होण्यासारखी आहे. तूं आपल्या दुर्बल मनोविकारांशीं झगडण्याचा निश्चय करशील तर अद्यापही तूं समाजास भूषण होशील. याप्रमाणें खऱ्या अंतःकरणानें तुम्हीं जर त्या मनुष्यास क्षमा करून त्यास उपदेश केला तर तो मनुष्य बहुतेक अंशीं आपला जुना मार्ग सोडून देऊन सत्याच्या मार्गाचें अवलंबन करील. परंतु तुमच्या त्या क्षमेचा योग्य परिणाम व्हावा अशी जर तुमची इच्छा असेल तर ती क्षमा विधायक असावी, निषेधात्मक असूं नये. ती अंतःकरणपूर्वक असावी, केवळ वरवरची नसावी. क्षमेच्या द्वारें व्यक्तिमात्रांतील जो गुणाचा भाग त्याच्याकडे प्रेमानें पहावयास शिकलें पाहिजे. पण तुमची कल्पनाशक्ति वाढल्याशिवाय ही गोष्ट शक्य नाहीं. ही कल्पनाशक्ति म्हणजे भ्रांति उत्पन्न करणारी आहे. किंवा कांहीं तरी काल्पनिक विषयांस अगर विचारांस प्राधान्य देऊन आपणांस वेडी करणारी आहे, असें समजूं नये. जिच्यायोगे सर्वत्र जें मंगल आहे त्याच्याकडेच आपली दृष्टी वळते, व आपण शोकानें अगदीं विव्हल झालों असतांही आपणांमध्यें आशा उत्पन्न करणारी जी शक्ति ती ही कल्पनाशक्ति होय. ती केवळ कवि किंवा साधु यांच्याच उपयोगाची आहे असे नव्हे, तर ज्यांचा आयुष्यांतील व्यवहाराशी प्रत्यक्ष संबंध येतो असे मुत्सद्दी व शास्त्रवेत्ते यांचेही या कल्पनाशक्तीवांचुन चालावयाचें नाहीं. मोठ्या स्वीकृत कृत्यामध्यें या कल्पनाशक्तीची अत्यंत जरूरी आहे. चितान्याचे ठिकाणीं ही कल्पनाशक्ति नसेल तर त्याला आपली कला पूर्ण अवगत होणार नाहीं. वक्त्याचे ठिकाणीं खरेपणा नसेल तर त्याच्या वक्तृत्वाचा परिणाम श्रोतृवृंदावर फार दिवस टिकणार नाहीं. त्याचप्रमाणें, पापी मनुष्यावर क्षमेचा योग्य परिणाम घडून येण्यास व त्याला ती लाभदायक होण्यास क्षमेंत खरेपणा, आशा, धैर्य व मनुष्याच्या सत्वगुणांवरील विश्वास यांचा समावेश व्हावयास पाहिजे. अशा प्रकारची क्षमा आपल्यामध्यें आणण्याचा प्रयत्न करा असें तुकोबा आपल्याला सांगत आहे, व जगांतील आपला जो अनुभव त्यावरूनही आपणांस कळून येते कीं या गुणाची जर वाढ केली तर दुष्कृत्यांत नित्य रत असणाऱ्यास जागृत करण्याच्या कामीं क्षमारूपी मात्रेचा उपयोग खात्रीने होण्यासारखा आहे.



# हनुमानाप्रमाणें अक्षय सेवक

—संत विनोबा

**भक्तीचें महात्म्य फार मोठें आहे. भक्तीनें कोणतेंही कार्य सहज लीलेनें पार पाडतां येतें भक्ति कशी असावी? हनुमंता-सारखी! जन्मोजन्मीं देवांचा सेवक. त्या सेवेला खंड म्हणून नाहीं. अंतपारही नाहीं. संत विनोबानीं गीतेच्या पंधराव्या अध्यायावरील प्रवचनांत भक्तीचें महात्म्य किती सहजतेनें व सुंदरतेनें सांगितलें आहे!**

आज एका अर्थानें आपण गीतेच्या टोंकाला आलों आहोंत. पंधराव्या अध्यायांत सर्व विचारांची परिपूर्णता झालेली आहे. सोळावा सतरावा अध्याय हे परि-शिष्टरूप आहेत व अठराव्यांत उपसंहार आहे. म्हणून भगवंतांनीं पंधराव्या अध्यायाचे अखेरीस शास्त्र ही संज्ञा त्या अध्यायाला दिली.

**"अत्यंत गूढ हें शास्त्र निर्मळा तुज बोलिलों"**

असें भगवान् शेवटीं म्हणत आहेत. भगवान असें म्हणतात तें हा शेंवटचा अध्याय म्हणून नव्हे, तर आतांपर्यंत जीवनाचें जें शास्त्र, जे सिद्धान्त, सांगितले त्यांची पूर्णता या अध्यायांत केलेली आहे म्हणून, या अध्यायांत परामार्थ पुरा झाला. वेदाचें सारें सार यांत येऊन गेलें. परमार्थाचें भान मनुष्याला करून देणें हेंच वेदांचें काम. तें या अध्यायांत आहे. म्हणून याला 'वेदांचें सार' अशी गौरवाची पदवी मिळालेली आहे.

## भक्तीशिवाय आत्मज्ञान नाहीं

तेराव्या अध्यायांत देहापासून आत्मा अलग करण्याची आवश्यकता पाहिली. चौदाव्यांत तत्संबंधीं थोडा प्रयत्नवाद तपासला, रजोगुण व तमोगुण यांचा निग्रहानें त्याग करायचा, सत्वगुणाचा विकास करून त्याची आसक्ति जिंकावयची, त्याच्या फळाचा त्याग करावयाचा. अशा रीतीनें प्रयत्न चालावयाचे. हे प्रयत्न संपूर्णपणें फलद्रूप होण्यास आत्मज्ञानाची आवश्यकता आहे असें शेंवटीं सांगितलें. आत्मज्ञान हें भक्तीशिवाय शक्य नाहीं.

परंतु भक्तिमार्ग म्हणजे प्रयत्नमार्गाहून कांहीं निराळा नाहीं, ही गोष्ट सुच-विण्यासाठीं या पंधराव्या अध्यायाचे आरंभींच संसाराला एका महान् वृक्षाची उपमा

दिली आहे. त्रिगुणांनीं पोसलेल्या प्रचंड खांद्या या वृक्षाला आहेत. अनासक्ति व वैराग्य या शस्त्रांनीं हा वृक्ष छेदावा असें आरंभींच सांगितलें. गेल्या अध्यायांत जो साधनमार्ग सांगितला तो च येथें आरंभीं पुन्हां सांगितला हें स्पष्ट आहे. रज-तम मारावयाचे व सत्त्वगुणाचें पोषण करून विकास करावयाचा. एक विनाशक काम, एक विधायक काम. दोन्ही मिळून एकच मार्ग होतो गवत काढणें, बीं पेरणें हीं एकाच क्रियेचीं दोन अंगें. तसेंच हें. रामायणांत रावण, कुंभकर्ण व बिभीषण हे तिघे भाऊ आहेत. कुंभकर्ण तमोगुण आहे, रावण रजोगुण आहे, बिभीषण सत्त्वगुण आहे. आपल्या शरीरांत या तिघांचें रामायण रचलें जात आहे. या रामायणांत रावण-कुंभकर्णांचा नाशच विहित आहे. फक्त बिभीषण-तत्त्व, जर तें हरिचरणशरण होईल तर, उन्नतीला साधक व पोषक होऊं शकेल म्हणून संग्राह्य. आपण चौदाव्या अध्यायांत ही गोष्ट पाहिली. या पंधराव्याच्या आरंभीं पुन्हां तीच आहे. सत्त्व-रज-तमांनीं भरलेला संसार असंगशस्त्रानें छेदून टाका. रज-तमांचा निरोध करा. सत्त्वगुणाचा विकास करून पवित्र व्हा व त्याची आसक्ति जिंकून अलिप्त रहा, हा कमळाचा आदर्श भगवद्गीता मांडीत आहे. भारतीय संस्कृतींत जीवनांतील आदर्श वस्तूंस, उत्तमोत्तम वस्तूंस, कमळाची उपमा दिलेली असते. कमळ हें भारतीय संस्कृतीचें प्रतीक आहे. उत्तमोत्तम विचार प्रकट करण्याचें चिन्ह म्हणजे कमळ. कमळ स्वच्छ व पवित्र असून अलिप्त असतें. पवित्रता व अलिप्तता अशी दुहेरी शक्ति कमळाजवळ आहे. भगवताच्या निरनिराळ्या अवयवांना कमळाची उपमा देतात. नेत्रकमळ, पदकमल, करकमल, मुखकमल, नाभिकमल, हृदयकमल, शिरःकमल, सर्वत्र सौंदर्य व पावित्र्य असून अलिप्तता आहे हें दाखवावयाचें व आपल्या मनावर ठसवावयाचें.

**जागृताकडे देव येतो**

प्रयत्नांत भक्ति व आत्मज्ञान मिसळलीं गेलीं कीं ही पूर्णता येईल. प्रयत्नमार्गाचाच भक्ति हा हि एक भाग. आत्मज्ञान, भक्ति, ही त्याच साधनेंतील अंगें. ऋषि म्हणतो—

"यो जागार तं ऋचः कामयन्ते
यो जागार तमु सामानि यन्ति"

"जो जागृत असतो त्याच्यावर देव प्रेम करतात, त्याच्या भेटीसाठीं ते येतात" म्हणजे जो जागृत आहे त्याच्याकडे वेदोनारायण येतो. त्याच्याकडे ज्ञान येते, भक्ति येते' प्रयत्नमार्गाहून भक्ति व ज्ञान अलग नाहींत. प्रयत्नालाच गोडी आणणारीं हीं तत्वें आहेत, असें या अध्यायांत सांगावयाचें आहे. एकाग्र चित्तानें भक्तिज्ञानाचें हें स्वरूप श्रवण करा.

जीवनाचे तुकडे मी करूं शकत नाहीं. कर्म, ज्ञान व भक्ति हीं माझ्याच्यानें

निराळी करवत नाहींत व तीं निराळीं नाहींतहि. उदाहरणार्थ, या जेलमधील स्वयंपाकाचें काम पहा. पांचशें-सातशें माणसांची रसोई करण्याचें काम आपल्यांतील कांहीं मंडळीं पार पाडतात. रसोईचें ज्ञान नीट नसणारा माणूस जर या कामांत असेल तर तो रसोई बिघडवून टाकील. भाकऱ्या कच्च्या राहतील, नाहीं तर करपून जातील. परंतु रसोईचें नीट ज्ञान आहे असें आपण मानूं तरी जर त्या माणसांच्या हृदयांत त्या कर्मासंबंधी प्रेम नसेल, भक्तिची भावना नसेल या भाकऱ्या माझ्या बंधूना म्हणजे नारायणालाच खावयाच्या आहेत त्या नीट करूं दे, ही प्रभुसेवा आहे, अशी भावना जर त्याच्या हृदयांत नसेल तर ज्ञान असूनहि त्या कामाला तो लायक ठरणार नाहीं त्या रसोईच्या कामांत ज्ञान पाहिजे, तसेंच प्रेमहि हवे भक्तितत्वाचा सर हृदयांत असल्याशिवाय रसोई सुरस होणार नाहीं. म्हणून तर आईशिवाय हें काम होत नाहीं. आईशिवाय हें आस्थेनें प्रेमळपणें कोण करील शिवाय या कामासाठीं तपस्याहि हवीच ताप सहन केल्याशिवाय, कष्टाशिवाय हें काम होणार कसें ? एकाच कार्यांत प्रेम, ज्ञान व कर्म या वस्तु लागतात असें दिसून येतें. जीवनांतील सारीं कर्मे या गुणांवर उभी आहेत. तिपाई : असते, तिचा एखादा पाय पडला तर ती उभी राहणार नाहीं. तिन्ही पाय हवेत. तिच्या नांवांतच तिचे स्वरूप आहे. जीवनाचें तसेंच आहे. ज्ञान, भक्ति व कर्म म्हणजे श्रमसातत्य, हे जीवनाचे तीन पाय आहेत. या तीन खांबावर जीवनाची द्वारका उभा रावयाची. हे तीन पाय मिळून एकच वस्तु होते. तिवईचा दृष्टांत अक्षरशः लागू पडतो. तर्कानें तुम्हीं भक्ति, ज्ञान कर्म अलग माना, परंतु प्रत्यक्ष त्यांना अलग करतां नाहीं. असा तिन्हीं मिळून एकच विशाल वस्तु बनते.

## भक्तीमुळें श्रम वाटत नाहींत

असें जरीं असलें तरी भक्तीचा असा विशेष गुण नाहीं असें नाहीं. कोणत्याहि कर्मांत भक्तितत्व जर दाखल होईल तर तें कर्म सुलभ वाटेल. सुलभ वाटेल म्हणजे कष्ट पडणार नाहींत असें नाहीं. परंतु ते कष्ट, कष्ट आहेत असें वाटणार नाहीं. कष्ट आनंदरूप वाटतील. ते कष्ट फुलासारखे वाटतील भक्तिमार्ग सोपा या म्हणण्यांतील रोख काय ? याचा रोख असा कीं भक्तिमुळें कर्मांचा बोजा वाटत नाहीं. कर्मांचें काठिण्य जाते. किती हि काम केलें तरी न केल्यासारखे वाटतें. भगवान ख्रिस्त एके ठिकाणीं म्हणतात, "तूं उपवास करशील तर तुझा चेहरा उपवास केल्यासारखा दिसतां कामा नये गालाला उटणीं लावल्याप्रमाणें चेहरा प्रफुल्लित व आनंदी दिसूं दे. उपवासाचे कष्ट पडत आहेत असें नाहीं दिसतां कामा." सारांश, वृत्ति इतकी भक्तिमय हवी कीं कष्टांचा विसर पडावा. आपण म्हणतों ना कीं अमुक देशभक्त हसत फांशीं गेला. सुधन्वा तेलाच्या कढईत हसत होता, मुखानें कृष्ण, विष्णु, हरि, गोविंदा, म्हणत होता. या

म्हणण्याचा अर्थच हा कीं अपार कष्ट झाले तरी ते भक्तीमुळें भासले नाहींत पाण्यावर असलेली होडी लोटणें कठिण नाहीं. परंतु ती जमीनीवरून खडकारून ओढीत न्यावयाची असेल तर किती श्रम होतो पहा! होडीच्या खाली पाणी असेल तर सहजतेनें आपण तरून जातों. त्याप्रमाणें आपल्या जीवननौकेच्या खालीं जर भक्तीचें पाणी असेल तर ही नौका आनंदानें वल्हवून नेतां येईल. परंतु जीवन जर शुष्क असेल, वाटेंत वाळवंट असेल, दगडधोंडे असतील, खांच खळगे असतील, तर नौका ओढून नेण्याचें काम फार बिकट होऊन जाईल. भक्तितत्त्व जीवननौकेला पाण्याप्रमाणें सुलभता प्राप्त करून देतें.

## आत्मदर्शन

भक्तिमार्गानें साधनेला सुलभता येते, परंतु आत्मज्ञानाशिवाय त्रिगुणांच्या पलीकडे कायमचें जावयाची आशा नाहीं. तर मग आत्मज्ञानाला साधन कोणतें? सत्वसातत्यानें सत्वगुण अंगी पचवून त्याचा अहंकार व त्याचा फलाची आसक्ति जिंकण्याचा भक्तीचा प्रयत्न, हेंच तें साधन. या साधनानें सतत अव्याहत प्रयत्न करतां करतां एक दिवस आत्मदर्शन होईल. तोंपर्यंत प्रयत्नाला शेवट नाहीं. परमपुरुषार्थाची ही गोष्ट आहे. आत्मदर्शन ही गमतीची गोष्ट नाहीं. सहज मौजेनें आत्मदर्शन होईल असें नाहीं. त्यासाठीं सतत प्रयत्नधारा सुरू हवी. परमार्थाच्या मार्गांतील शर्तच मुळीं ही कीं "मी एक क्षणहि निराशेला जागा देणार नाहीं. एक क्षणहि निराश होऊन स्वस्थ बसणार नाहीं." परमार्थाचें दुसरें साधन नाहीं एखादे वेळेस साधकाला थकवा येऊन त्याच्या तोंडांतून

"तुमकारण तप संयम किरिया,
कहो कहांलौ कीजे!"

"देवा, कोठवर तुझ्यासाठीं हीं तपस्या करूं?" असे उद्गार बाहेर पडतात. परंतु उद्गार गौण आहे. तपस्या व संयम इतकी अंगवळणी पडूं देत कीं तो स्वभावच होईल. कोठपर्यंत साधना करूं, हा शब्द भक्तीमध्यें शोभत नाहीं. अधीरभाव, निराशाभाव, भक्ति कधींहि उत्पन्न होऊं देणार नाहीं. असा कंटाळा कधीं न वाटावा, भक्तींत उत्तरोत्तर उल्हास व उत्साह वाटावा, यासाठीं फार सुंदर विचार या अध्यायांत मांडला आहे.

## पूजेचें साहित्य

या विश्वांत आपणांस अनंत वस्तु दिसत आहेत. या सर्व वस्तूंचे तीन भाग करावयाचे. एखादा भक्त सकाळीं उठला कीं तीनच वस्तु त्याच्या डोळ्यांसमोर दिसतात. त्याचें आधीं लक्ष देवाकडे जातें. मग देवाच्या पूजेची तो तयारी करतो. मी

सेवक भक्त, तो सेव्य असा देव, स्वामी या दोन वस्तु त्याच्याजवळ सदैव हजर असतातच. उरलेली सारी सृष्टि म्हणजे पूजेची साधनें. फुलें, गंध, धूपदीप, यासाठीं सारी सृष्टि. तीनच वस्तु. सेवक भक्त, सेव्य परमात्मा, व सेवासाधनें म्हणून ही शिकवण या अध्यायांत आहे. परंतु एखाद्या मूर्तीची पूजा करणारा जो सेवक असतो त्याला सृष्टींतील सर्वच वस्तु पूजेची साधनें वाटत नाहींत. तो बगीच्यांतून चार फुलें तोडून आणतो. कोठली उदबत्ती आणतो, कांहीं तरी नैवेद्य दाखवितो. त्याला निवडानिवड करावीशी वाटते. परंतु पंधराव्या अध्यायांत जी विशाल शिकवण आहे तिच्यांत निवडानिवड नाहीं. जीं जीं तपस्येचीं साधने, कर्मांचीं साधनें, तीं सारीं परमेश्वराच्या सेवेची. त्यांतील कांहींस फुलें म्हणूं या, कांहीस गंध म्हणूं या, कांहींस नैवेद्य संबोधूं या. अशा प्रकारें यच्चयावत् सर्व कर्मे पूजाद्रव्यें करावयाचीं, अशी ही दृष्टि आहे. जगांत फक्त तीनच वस्तु. जो वैराग्यमय साधनमार्ग गीता आपल्या मनावर ठसवूं पाहत आहे. घ्या मार्गाला गीता भक्तिमय स्वरूप देत आहे. त्यांतील कर्मपणा काढून टाकीत आहे व त्यामुळें सुलभता आणीत आहे.

आश्रमांत एखाद्याला जर खूप काम पडलें, तर ' मलाच जास्त काम कां पडले ' असा त्यांच्या मनांत विचारच येत नाहीं, यांत मोठें सार आहे. पूजा करणाऱ्यास दोन तासांऐवजी चार तास पूजा करावयास मिळाली, तर " काय बुवा, आज चार तास पूजा करावी लागत आहे " असें तो कंटाळून म्हणेल का ? त्याला अधिकच त्याचा आनंद होईल. आश्रमांत हा अनुभव येतो. तो अनुभव सर्व जीवनांत सर्वत्र आला पाहिजे. जीवन सेवापरायण झालें पाहिजे. सेव्य असा तो पुरुषोत्तम, त्यांच्या सेवेसाठीं सदैव उभा असा मी अक्षर पुरुष. अक्षर पुरुष म्हणजे कधींहि न भागणारा, सृष्टींच्या आरंभापासून सेवा करणारा. सनातन सेवक. जसा हनुमान रामासमोर सदैव हात जोडून उभाच त्याला आळस माहीत नाहीं. त्या हनुमानाप्रमाणें चिरंजीव असा हा सेवक उभा आहे.

**पुरुषोत्तमाची पूजा**

असा आजन्मसेवक म्हणजे अक्षर पुरुष. परमात्मा ही संस्था जिवंत आहे व मी सेवकहि सदैव आहे. प्रभु कायम तर मीहि कायम. तो सेवा घेऊन दमतो की मी सेवा करून दमतों, पाहूंच या मौज. त्यानें दहा अवतार घेतले तर माझेहि दहा. तो राम झाला तर मी हनुमान्. तो कृष्ण झाला तर मी उद्धव. जितके त्याचे अवतार तितके माझे. लागूं दे अशी गोड चढाओढ. परमेश्वराची अशी युगानुयुगें सेवा करणारा, कधींहि नाश न पावणारा, असा हा जीव हा अक्षर पुरुष. तो पुरुषोत्तम स्वामी व मी त्याचा बंदा सेवक, अशी भावना सारखी हृदयांत धरावयाची. आणि ही हरघडी बदलणारी, अनंत रुपांनीं नटणारी सृष्टि, हीं सारीं पूजेची साधनें, सेवेचीं साधनें, करावयाची. प्रत्येक क्रिया म्हणजे पुरुषोत्तमाची पूजा.

सेव्य परमात्मा पुरुषोत्तम, सेवक जीव हा अक्षर पुरुष. परंतु ही साधनरूप सृष्टि क्षर आहे. ती क्षर आहे यांत मोठा अर्थ आहे. सृष्टीचें हें दूषण नसून भूषण आहे. त्यामुळें सृष्टीस नित्य नवीनता आहे. कालचीं फुलें आज चालावयाचीं नाहींत. तीं निर्माल्य झालीं. सृष्टि नाशिवंत आहे हें मोठें भाग्य आहे. हें सेवेचें वैभव आहे. रोज नवीन फुलें सेवेला त्याप्रमाणेंच हें शरीरसुद्धां नवीन नवीन धारण करून परमेश्वराची सेवा करीन. माझ्या साधनांना रोज नवीन स्वरूप देईन व त्यानें त्याची पूजा करीन. नाशिवंतामुळें सौंदर्य आहे. चंद्राची कला आजची उद्यां नाहीं. चंद्राचें रोज निराळें लावण्य. द्वितीयेचा तो वर्धमान चंद्र पाहिला म्हणजे केवढा आनंद होतो ! शंकराच्या भालप्रदेशावर ती द्वितीयेची चंद्रशोभा प्रकट झाली आहे. अष्टमीच्या चंद्राचें सौंदर्य विशेष असतें. अष्टमीस आकाशांत वेंचक मोत्येंच दिसत असतात. पौर्णिमेला चंद्राच्या तेजानें तारका दिसतच नाहींत पौर्णिमेला परमेश्वराचा मुखचंद्र दिसतो. अमावस्येचा आनंद तर फार गंभीर असतो. अमावास्येच्या रात्रीं केवढी निःस्तब्ध शांतता असते. चंद्राचा जुलमी प्रकाश नसल्यामुळें लहानमोठे अगणित तारे पूर्ण स्वातंत्र्यानें चमचम करीत असतात. अमावस्येला स्वातंत्र्याचा पूर्ण विलास असतो. आपल्या तेजानें दिमाख दाखवणारा चंद्र आज येथें नसतो. स्वतःला प्रकाश देणाऱ्या सूर्याशीं त्या दिवशीं तो एकरूप झालेला असतो. परमेश्वरांत मिळून गेलेला असतो. जीवानें स्वात्मार्पण करून आपणांपासून जगाला यत्किंचित्‌हि त्रास पोंचूं नये असें जणूं त्या दिवशीं तो दाखवीत असतो. चंद्राचें स्वरूप क्षर आहे, बदलतें आहे, परंतु तें निरनिराळा आनंद देतें.

सृष्टीचा नाशिवंतपणा म्हणजेच तिची अमरता. सृष्टीचें रूप झुळझुळ वाहून राहिलें आहे. ही रूपगंगा जर वाहत नसेल तर तिचें डबकें होईल. नदीचें पाणी अखंड वाहत असतें. पाणी सारखें बदलतें आहे. हा थेंब गेला दुसरा आला. तें पाणी जिवंत राहतें. वस्तूंतील आनंद नवीनपणामुळें वाटतो. ग्रीष्मऋतूंत देवाला निराळींच फुलें. पावसाळ्यांत त्या हिरव्यागार दुर्वा वहावयाच्या. शरदृतूंत ती रमणीय कमळें वहावयाचीं. तद्वत्‌ ऋतुकालोद्भव फलपुष्पांनीं देवाची पूजा करायची. यामुळें ती पूजा टवटवीत नित्य नवीन वाटते, कंटाळा येत नाहीं. लहान मुलांना "क" काढून देतात व म्हणतात, "गिरव. जाड कर." ती 'क' ची कटकट मुलाला कंटाळा आणते. अक्षर जाडें कां करायचें त्याला समजत नाहीं. तो पेन्सिल आडवी धरून तें अक्षर लवकर जाडें करतो. परंतु पुढें नवीन अक्षरें त्यांचे समुदाय, तो पाहतो. निरनिराळीं पुस्तकें तो वाचूं लागतो. साहित्यांतील नानाविध सुमनमाळांचा अनुभव तो घेतो. त्याला अपार आनंद होतो. तसेंच सेवाप्रांतांत आहे. नवीन नवीन साधनांमुळें सेवेची हौस वाढते. सेवावृत्तीचा विकास होतो.

**सृष्टिपासून शिक्षण**

सृष्टीचा नाशिवंतपणा रोज नवीं फुलें फुलवून राहिला आहे. गांवाजवळ स्मशान आहे म्हणून गांवाला रमणीयता आहे. जुनी माणसें जात आहेत, नवीनें बाळें जन्मत आहेत, त्तष्टि नवीन वाढत आहे. बाहेरचें तें स्मशान जर नाहींसें कराल तर तें घरांत येऊन बसेल. तुम्ही कंटाळाल तींच तीं माणसें अखंड पाहून. उन्हाळ्यांत उन्हाळा असतो. पृथ्वी तापते. परंतु यामुळें त्रस्त होऊं नका. हें रुप बदलेल. पावसाचें सुख अनुभवण्यासाठीं तापलें पाहिजे.जमीन जर खूप तापून निघालेली नसेल तर पाऊस पडतांच केवळ चिखल होईल. तृणधान्यें नटणार नाहींत. मी एकदां उन्हाळ्यांत हिंडत होतों. डोकें तापत होतें. आनंद वाटत होता. मला एक मित्र म्हणाला, "डोकें तापेल, त्रास होईल." मीं म्हटलें, "ही खालची माती तापत आहे. हा मातीचा गोळाहि तापू दे जरा." डोकें तापलेलें असावे व मग ती पावसाची धार यावी. कसा आनंद असतो! परंतु जो उन्हांत तापत नाहीं. तो पाऊस आला तरीहि पुस्तकांत डोकें खुपसून बसेल. घरांतील खोलींत त्या थंडग्यातच बसून राहील. बाहेरच्या या विशाल अभिषेकपात्राखालीं उभा राहून नाचणार नाहीं. परंतु तो आमचा महर्षि मनु तो मोठा रसिक व सृष्टिप्रेमी. तो स्मृतींत लिहितो, "पाऊस पडूं लागला म्हणजे सुट्टी द्यावी." पाऊस पडत असतांना आश्रमांत का घोकीत बसायचें? पावसांत नाचावें गावें, सृष्टीशीं एकरूप व्हावें. पावसांत पृथ्वी व आकाश एकमेकांस भेटत असतात. ते थोर दृश्य केवढें आनंददायी असतें! ही सृष्टि स्वतः शिक्षण देऊन राहिलीं आहे.

सारांश, सृष्टीच्या क्षरता, नाशिवंतता, म्हणजे साधनांची नवीनता. अशी नवनवप्रसवा साधनदात्री ही सृष्टि, कंमर कसून सेवेसाठी ऊभी असा तो सनातन सेवक व तो सेव्य परमात्मा. आतां चालूं दे खेळ. तो परमपुरुष पुरुषोत्तम निरनिराळीं सेवासाधनें देऊन माझ्याकडून प्रेममूलक सेवा घेऊन राहिला आहे. तो मला नाना साधनें देऊन खेळवून राहिला आहे.



# संत सेना न्हावी

ह. भ. प. श्री दासगणु महाराज यांनीं अनेक संतांच्या जीवना-वर कीर्तनाख्यानें रचिलीं. तीं सारीं सुबोध, रसाळ व कर्णमधूर आहेत. सेना न्हावी या संतावर त्यांनीं, असेंच सुंदर आख्यान रचिलें आहे. त्याचा सारांश पुढें देण्यांत येत आहे. त्यावरून मूळ आख्यानाची कल्पना करतां येईल.

सेना न्हाव्याच्या चरित्रांत त्याना एक प्रसंग असाच गोंविला आहे. सेनाला बादशहाची श्मश्रु करण्यास जाण्यासाठीं इतका उशीर कां झाला, याचें कारण सांगत असतांना एका गवळणीच्या म्हशीचें काम सेनानें पत्करिलें, असें महाराजांनीं लिहिलें आहे. या वेळचा गवळणीच्या व सेनाचा संवाद मोठा मनोरंजक आहे. या निमित्तानें समाजसेवा ही राजसेवेपेक्षांहि जास्त महत्वाची कशी आहे, हें मोठ्या युक्तिनें व मर्मिकतेनें सुचविलें आहे.

एकदां एकादशीचा दिवस असल्यानें कोणीच न्हावी खुंटावर नव्हता. सेना बादशहाचा न्हावी असला तरीहि त्यानें जनसेवेचें निष्काम व्रत सोडलें नव्हतें. दुसरा कोणीच न्हावी दिसत नाहीं, असें पाहून गवळण रागानें म्हणाली– "आज माझें काम निघालें तर एकजण खुंटावर नाहीं, पण–

"काम नसल्या येती मेले। ताक मागायाला घरीं"

तिचें हें रागाचें भाषण ऐकून सेना मनाशीं म्हणाला, "ही अशीच रागावलेली राहील, तर माझ्या गरीब ज्ञातिबांधवांना कोरड्यास मिळणारें ताकहि उद्यांपासून दुर्लभ होईल!" तो गवळणीस म्हणाला, "मायबाई, रागावतां कां उगीच! न्हाव्यांनीं कांहीं खुंट मोकळा टाकला नाहीं. मी येथें उभा आहेना!"

"काय आहे तव काम मला सांग। नको न्हाव्यांचा वृथा करूंस राग"

यावेळीं महाराजांनीं गवळणीच्या तोंडीं एक मोठें सुरेख पद घातलें आहे.

"तूं असुन नसुन सारखा तुला मी काय काम सांगूं!
कण्या कां कुबेरास मागूं!
माझी डोबड मोरी भोरी नदीज्या वरी भादराया
गुराखी आला घेऊनियां

तूं वारिक ना आमुचा, बादशहाचा वतनदार
आम्हां पाहिजे बलोतदार
गणु म्हणे दुधाला वाटी ताका नरवंटी न्याय ठरला
चणे ना देति हलगटाला ॥"

या प्रसंगींची सेनाला उद्देशून दिलेली दुधाच्या वाटीचा व बलेतिदाराच्या करितां वापरलेली ताकाच्या नरोटीचा उपमा एका गवळणीच्या तोंडी किती उचित आहे, हें जाणत्यांना सांगणें नकोच. चणे ज्याप्रमाणें हलगटला देत नाहींत, त्याप्रमाणें बादशहाचा वतनदार न्हावी म्हशीच्या हलक्या कामाला योग्य नाहीं. थोरांना थोरच काम सांगितलें पाहिजे. तें ऐकतांच–'मी थोरांचा आहे, थोर आहे, असें तुला खरेंच वाटतें कां ? तसें असेल, तर मला कोणतेहि काम हक्कानें सांग. कारण,—

"थोरांचें जितुकें तयावरी असें सत्ता जगाची खरी ।
गंगेला बुध भूप विप्र खलंही येऊन पाणी भरी ।
सूर्याची किरणें समान सकलां मेघोदरींचें जल ।
केली कां महिनें कधीं निवड कीं हीं सुष्ट वा खल ? ॥

सेनानें त्याप्रमाणें नदीवर जाऊन गवळणींचें सर्व काम उरकलें. घरीं येऊन स्नान करून तो पूजेस बसला, इतक्यांत बादशहाचा शिपाई त्याला बोलाविण्यास आला. एकादशीनिमित्त पंढरपुरला जाण्याची इच्छा बादशहानें हट्टानें धुडकावून लावलेली होती. त्यामुळें एकादशीच्या पुण्य दिवशीं शांतपणें पूजा करतां येतं नाहीं. याचें सेनाला मोठें वैषम्य वाटलें. या प्रसंगीं झालेल्या सेना व त्याची पत्नी यांच्यामधील संवादांतून राजनिष्टेच्या मर्यादा महाराजांनीं स्पष्ट केल्या आहेत. मार्क्सीय लोकशाही ज्यावेळीं केवळ कल्पनेंतच होती, त्याकाळीं—

" अवन्तरांचा पाड मुळींना अवघें लोकांहातीं
जनाहून श्रेष्ठ नव्हे भूपति ।"

असा सिद्धान्त महाराजांनीं सहजपणें मांडला आहे. रयतेच्या हक्काची पायमल्ली करून स्वतः चैन करणाऱ्या राजाला महाराजांनीं या ठिकाणी 'कृष्णसर्प' म्हटलेलें आहे.

आज्ञेप्रमाणें सेना येत नाहीं, हें पाहतांच बादशहा संतापला व त्यानें सेनाचें घर जाळून टाकण्याचा हुकूम दिला; त्यावेळीं सेनाच्या घराभोंवतीं जमलेल्या बघ्यांच्या संभाषणांतून महाराजांनीं राजनीतीचें योग्य लक्षण दाखविण्याचें काम मोठ्या हळुवारपणें नि सफाईदारपणें केलें आहे. खुबीदार गोड शब्दानें व सयुक्तिक विचारानें राजानें कसा न्याय केला पाहिजे. राजसत्तेचा निषेध कोठपर्यंत व कसा करावा, हें

समाजाचें शाश्वत हित लक्षांत ठेवून महाराजांनीं या ठिकाणीं दाखविलें आहे. सेनाचें घर पेटतें आहे, असें पाहून निरनिराळ्या प्रवृत्तीचें लोक काय बोलले, तें या ठिकाणीं काव्यरूपानें वर्णन केलेलें आहे. व्यक्तिस्वभावांचें हें वर्णन मार्मिक आहे. कोणी म्हणाले 'ही आज्ञा योग्य नाहीं—बाळकाच्या चोरीस फांशी कांहं?' कांहीं म्हणाले, 'बादशहाच्या न्यायीपणास हा कलंक आहे.' कांहींना या आज्ञेमध्यें कोणताहि दोष दिसला नाहीं—

नृपानिनें बरीं हें केलें मगरुरी त्याचि जिरविली।
वारिक हा हलकट बेटा हुकुमाची अवज्ञा केली ॥

उलट त्यांचें असें म्हणणें पडलें कीं, जरब राहण्यासाठीं असेंच वागलें पाहिजे.

कांहीं आपल्यापुरतें पाहणारे—आतां या राज्यांत राहण्यांतच अर्थ नाहीं.

'हें लागलें खचित कुंपण ऊंस खाया'

त्या बघ्यांमध्यें कांहीं भडक 'देशभक्तहि' होते. त्यांना सेनापेक्षां त्याच्या स्मारकाची (?) चिंता अधिक! ते म्हणाले,

"घरासह सेना ये ठाया, जरी जळाला तरि तें होईल स्मारक दावाया!"

कांहीं मवाळ म्हणाले, 'राजाचें जरी चुकलें तरी त्यावर पांघरूणच घातलें पाहिजे.' तर दुसरे जहाल म्हणाले—'छेः! राजाचे दोष जाहीरच केले पाहिजेत, लांगूलचालन कधींच करतां कामा नये.' परंतु समतोल विचारांचे जे विवेकी पुरुष होते, त्यांनी मात्र योग्य निर्णय घेतला.

"भूपति बघुनि एकान्ति, बुधे त्याप्रती, दोष दावावे।
अंगिचें तयाच्या परि न दहांत बोलावें?
मळुं नये कधीं केशर, कीं उघड्यावर पाहिजे घर प्रसूतिसाठीं!
गृहछिद्र कुणी कां कळवि दौंडीनें हाटीं।
सनु रयत प्राण जो जाणा भूपति।
रुधीर हें हक्क रयतेचें निश्चित।
जाहल्या हानि रुधीरास, घात दोघांस, होईल कीं खास, मनी आणावें.
बघुनियां मागें पुढें म्हणत गणू चालावें!"

हा विचारांचा समतोलपणा, ध्येय म्हणून लक्षांत घेण्यासारखा आहे. परकीय राजसत्ता असते, त्या वेळीं भडक बोलणें कितीहि योग्य भासवलें, तरीहि राजसत्ता व प्रजा यांच्यामधील संबंधानें परिस्थितिनिरपेक्ष अशा शाश्वत हिताच्या दृष्टीनें या सरीक पदांत मांडलेले विचार अत्यंत महत्वाचें आहेत व समाजाच्या कल्याणासाठीं त्यांचाच खरा उपयोग आहे, सहज पटणारें आहे.

---

# नामदेवांची वाणी

अनुवादक : गणेश विष्णु कविटकर, एम्. ए.

: १८ :

## राम नाम नरहरि श्रीबनवारी

नरहरि, श्रीकृष्ण हीं रामाचीच नांवे होत. म्हणून निरंतर श्रीकृष्ण चरणांची सेवा कर श्रीगुरूंचा शब्द हा वैकुंठाला नेणारा मार्ग आहे आणि हृदयरूपी क्षेत्रांमध्यें प्रेमरस उत्पन्न करणारा आहे. ज्याच्याकरितां सारे त्रिभुवन धुंडाळले, तो परमनिधान आपल्या घरींच मिळूं शकतो. म्हणून नामदेव म्हणतात, इतरत्र कुठेंहि न जातां घरीं बसूनच रामनामाचा जप करावा.

: १९ :

## केते पच गये हैं कोटि ब्रह्मा

त्या अनंतकोटि ब्रह्मांडाला कोण जाणूं शकले आहे? अरे! देव, मनुष्य व ऋषिजन ह्यांना देखील त्यांचा थांग लागलेला नाहीं. विषयरूपी समुद्रामध्यें दिङ्मूढ झालेल्या हे मर्त्य मानवा मीं जे सांगत आहे ते माझ्या मित्रा ऐक! अरे आभिमान सोड आणि निष्काम पवित्र असें कर्म कर हे नामदेवाच्या हृदयांत राहणाऱ्या ईश्वरा तुझा महिमा अगम्य व अगाध आहे.

: २० :

## रट मेरी रसना राम राम

हे जिव्हे! तूं केवळ रामनामाचाच तप कर. कारण रामनाम आणि हरिनाम हेच अमृत आहे. ज्यांच्या घरीं साधुपुरुष प्रवेश करतात त्यास धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चार वस्तूंची प्राप्ति घर बसल्या होत असते. तुझ्यावर साधुसंतांचे फार उपकार आहेत. कारण कलियुगांत त्यांनीं पृथ्वीवर अवतार घेतला आहे. साधु संगति खेळीमेळीनें मिळाली आहे. तेव्हां मित्रमैत्रिणीसह त्यांचे गुणगान करीत साधूंच्या चरणावर लीन होऊन जा. हा दास नामदेव साधूंच्या भेटीला व दर्शनाला आला आहे.

: २१ :

## जहाँ तुम्ह गिरवर तहाँ मैं मोरा

जेथें तूं पर्वतराज आहेस तेथें मी मोर आहे. जेथें तूं चंद्र आहेस तेथें मी चकोर आहे. जेथें तूं वृक्षावर आहेस तेथें मी पक्षी आहे. जेथें तूं सरोवर आहेस तेथें मी मासा आहे. जेथें तूं दिवा आहेस तेथें मी वात आहे. जेथें तूं पथिक आहेस तेथें मी तुझा साथी आहे. नामदेव म्हणतात, ज्याप्रमाणें बेलाची पानें आणि शंकरपूजा हीं वेगळीं होवूं शकत नाहीं त्याप्रमाणें माझ्यांत आणि त्या परमात्म्यांत कोणताहि दुजाभाव राहिलेला नाहीं.

MATUNGA CLEANING WORKS

ESTD. 1934 *Prop.* S. V. PRADHAN

MODI NIWAS, BOMBAY 19

Washers, Dyers and Dry Cleaners.

A Pleasure to You—A Satisfaction to Us

Chemical Cleaners, Super Fine Darners

Master Dyers

*FOR*

Cotton, Woollen, Silken & Jari Whole Cloths

सर्व तऱ्हेच्या कपड्यांची धुलाई, रंग व रफू काम व्यवस्थित करणार

माटुंगा क्लीनिंग वर्क्स

स्थापना १९३४ ) मोदी निवास, मुंबई १९ ( मालक: एस्. व्ही. प्रधान




# शिर्डीवृत्त जून १९६४

यामहिन्यांत शिर्डीस येणाऱ्या भक्तांचें प्रमाण कमी होते. खालील कलाकारांनीं श्रीपुढें हजेरी दिली ती खालील प्रमाणेः—

**कीर्तन** संस्थानमर्फत विठ्ठलराव मराठे वैशाख व॥ ११ व जेष्ठशु॥ ११ अशी दोन कीर्तनें श्रींचे मंदिरांत झालीं.

**गायन** श्री. मास्टर लहानू नागपुरे. न्यू दिल्ली, श्री. दामोदर मधुसुदन, वैद्य औरंगाबाद (मराठवाडा) सौ. साधना दामोदर वैद्य औरंगाबाद (मराठवाडा) श्री. पुरुषोत्तम शंकर जोशी पुणे. कुमारी शरयू बाळकृष्ण कलंकी इन्दौर मध्यप्रदेश श्री. इच्छाशंकर जोशी मुंबई.

**भजन** श्री, विठ्ठल प्रासादिक भजनी जुहू कोळीवाडा. मुंबई मुख्यगायक श्री. देवजी धुबा कोळी मुंबई.

**हार्मोनियमवादन** श्री. शंकरदास लेमी टिळकरोड हैद्राबाद (डेक्कन) आंध्र प्रदेश.

**लोकनाट्य** श्री. हरिभाऊ दशरथ बडे चिंचपूर पाथर्डी नगर.

**हवापाणी** शिर्डी येथील हवापाणी ठीक आहे. पावसाळा सुरू झाला आहे. हवा ढगाळ व कुंद आहे.

**Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi**

**श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेली पुस्तकें**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | **श्रीसाईसच्चरित्र** | (मराठी) | श्री. दाभोळकरकृत | ७–०० |
| (२) | ,, | (हिंदी) | श्री. ठाकूर | ४–५० |
| (३) | ,, | (गुजराथी) | श्री. सोमपुरा | ३–७५ |
| (४) | ,, | (इंग्रजी) | Shri Gunaji | ४–०० |
| (५) | ,, | (Kannad) | N. S. Anantha Raum | ३–०० |
| (६) | **Glimpes of Indian Spirituality**– by Pradhan | | | १–०० |
| (७) | **Glimpes of Indian Spirituality** (Telgu) | | | १–०० |
| (८) | **श्री साईलीलामृत** | (मराठी) | श्री. आगास्करकृत | २–०० |
| (९) | ,, | (हिंदी) | श्री. चिटणीस–दिल्ली | २–५० |
| (१०) | **साईबाबा–अवतार व कार्य** | (मराठी) | श्री. धोंड | २–०० |
| (११) | **साईबाबांचे ४ अध्याय** | (मराठी) | श्री. दासगणू | ००–५० |
| (१२) | **सगुणोपासना** | (मराठी) | श्री. भीष्म | ००–२५ |
| (१३) | ,, | (गुजराथी लिपींत) | श्री. भीष्म | ००–२५ |
| (१४) | **श्री रुद्राध्याय ११ वा** | (मराठी) | श्री. दाभोळकर | ००–१२ |
| (१५) | **स्तवन–मंजरी** | (मराठी) | श्री. दासगणू | ००–१३ |
| (१६) | **श्री साई-सुमनांजली** | (मराठी १०८ नांवें) | | ००–०६ |
| (१७) | **कीर्तन पंचक** | (मराठी) | श्री. देव | १–५० |
| (१८) | **शोलधी** | (मराठी) | डॉ. गव्हाणकर | ००–७५ |
| (१९) | **श्री साईगीतांजलि** | (मराठी) | कवि श्रीपाद | ००–१२ |
| (२०) | **Spiritual Symphony** by R. S. Harshid Mehta | | | २–५० |
| (२१) | **Side lights on Sai Baba** (Eng.) Calcutta | | | ००–७५ |
| (२२) | **Guide to Shirdi** (English) | | | ००–१२ |
| (२३) | **स्तवनमंजिरी व सुमनांजली** | (मराठी) | | ००–२० |

**Colour pictures of Sai Baba by Neroy**

| | | |
|---|---|---|
| (1) | Baba sitting on Stone 15" × 20" Thick | **1–00** |
| (2) | ,, ,, ,, 9½" × 13½" medium | **00–37** |
| (3) | ,, ,, in Dwarkamai 9½" × 13½" medium | **00–50** |

Other different poses of Sai Baba in colour according to different sizes varying in prices.

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 37 nP. for No. 1 Postage Extra (minimum purchase of Rs. 15). *Can be had from* (मागवा):

1. **Executive officer Shri Sai Baba Sanstan,**
   P. O. Shirdi. Dst. Ahmednagar.
2. **Sai Baba Office 'Sai Niketan',**
   Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14.



मालक : **श्री साईबाबा संस्थान, शिरडी,** आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४ करितां

प्रकाशक : श्रीपाद बाळकृष्ण दर्प, मुंबई १४.



★

संगीताची मोहिनी माणसाला मंत्रमुग्ध करते, त्याचप्रमाणें कुठल्याहि हृदयंगम चित्राची मुद्रणकृति वाचकाला नयनमुग्ध करते!

★

आणि म्हणूनच

हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स, ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि आणि त्याचप्रमाणें वैशिष्ट्यपूर्ण सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

५३४, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई

टेलिफोन : ७५०४७


डी. डी. नेरॉय यांनीं खास तयार केलेले श्री साईबाबांचीं तीन रंगी चित्रे, द्वारकामाई व दगडावर बसलेले — साईज ६ x ८, १० x १४, १४ x २० खालील ठिकाणीं मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

**श्री साईबाबा संस्थान**

मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर व

साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.

मुद्रक : श. कृ. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.
संपादक व प्रकाशक : श्रीपाद बाळकृष्ण दर्पे, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड.